सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ४ थे ❏ अंक -२३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ ❏ संपादक -डॉ.शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षांची १५ दिवसात होणार निवड

### सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होणार ?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४मुंबई

अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची धुरा कोणाकडे जाणार यावरुन जोरदार चर्चा रंगली आहे. याचदरम्यान दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांनाही ऊत आलाय.अजित पवार यांच्या मृत्यूनंतर ४ थ्या दिवशीच त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यावरुन राजकीय चर्चा होत होती. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलंय.



राष्ट्रवादीचे आमदार, खासदारांकडून सुनेत्रा पवार यांना अध्यक्ष बनवलं जावं अशी मागणी केली जातेय. दरम्यान कोणाच्या गळ्यात राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची माळ पडेल याचे लवकरच मिळणार आहे. येत्या १५ दिवसांत राष्ट्रवादीच्या नव्या अध्यक्षाची निवड केली जाणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार आज सकाळपासूनच पुण्यातील सर्किट हाऊस येथे आहेत. येथे त्यांनी बैठकांचा थडाका लावलाय.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निकालानंतर विजयी झालेल्या सदस्यांच्या त्या भेटी घेत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांचे बंधू सुनेत्रा पवार यांच्या भेटीसाठी दाखल झालेत. पार्थ पवार आणि जय पवार हेही पुण्यातील सर्किट हाऊस या ठिकाणी पोहोचलेत. एकीकडे या भेटीची चर्चा सुरू असतानाच आता राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडीबाबत मोठी बातमी समोर आलीय.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड येत्या १५ दिवसांत होणार आहे. सर्वानुमते उपमुख्यंत्री सुनेत्रा पवार यांचीच निवड राष्ट्रीय अध्यक्षपदी होणार असल्याची माहिति राष्ट्रवादीच्या एका वरिष्ठ नेत्यानं दिली आहे. त्यामुळं आता पुढील १५ दिवस हे राज्यासाठी आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी देखील महत्वाचे असतील. त्यामुळं अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वीच राष्ट्रवादीला नवा अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड येत्या १५ दिवसांत होणार आहे. सर्वानुमते उपमुख्यंत्री सुनेत्रा पवार यांचीच निवड राष्ट्रीय अध्यक्षपदी होणार असल्याची माहिति राष्ट्रवादीच्या एका वरिष्ठ नेत्यानं दिली आहे. त्यामुळं आता पुढील १५ दिवस हे राज्यासाठी आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी देखील महत्वाचे असतील. त्यामुळं अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वीच राष्ट्रवादीला नवा अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान राष्ट्रवादीच्या सर्वच नेत्यांची पदाधिकाऱ्यांचा सुनेत्रा पवार यांच्या नावालाच पाठिंबा आहे. आता केवळ सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा होण्याची औपचारिकता बाकी असून त्याचा निर्णय पुढील काही दिवसात होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्षाची निवड झाली की त्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या घडामोडींना देखील वेग येणार असल्याच म्हटलं जातंय.

## मुख्यमंत्री फडणवीस आठवड्याभरात दुसऱ्यांदा दिल्ली दौऱ्यावर

### आधी शहांना भेटले, आता भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षांची घेतली भेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४नवी दिल्ली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा दिल्लीत गेल्यानं राज्यात तर्कवितर्कांना उधाण आलंय. काही दिवसांपूर्वीच त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेण्यासाठी गेले होते. त्यानंतर आठवड्याभराच्या आतच पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत गेले आहेत. राज्यात जिल्हा परिषद निवडणूक निकाल, महापौर-उपमहापौर निवड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणावरून सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर फडणवीसांच्या दिल्ली दौऱ्याची चर्चा रंगली आहे.फडणवीस दावोस दौऱ्यावर गेले असताना भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सूत्रे नितीन नवीन यांनी हाती घेतली होती. त्याचा भाजपच्या मुख्यालयात कार्यक्रम आयोजित केला होता. तेव्हा फडणवीसांना या कार्यक्रमासाठी उपस्थित राहता आलं नव्हतं. त्यानंतर फडणवीस दिल्लीला गेले पण नितीन नवीन बिहार दौऱ्यावर असल्यानं भेट होऊ शकली नव्हती. आता पुन्हा दिल्ली दौऱ्यावर गेले असता फडणवीसांनी नितीन नवीन यांची भेट घेतल्याचं समजते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला पुन्हा एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमासाठी गेले होते अशी माहिती समोर येतेय. पंतप्रधान नरेंद्र मोदीही या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेतली. या भेटीत काय चर्चा झाली हे समोर आलं नाहीय.अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा राज्यात सुरू झाली आहे. या चर्चांवर राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या नेत्यांनी आणि भाजप नेत्यांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण झाल्यास राज्यातील राजकीय समीकरणं बदलण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांचा दिल्ली दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.






## मुंबईत मेट्रो पिलर स्लॅब थेट ऑटो अन कारवर कोसळला

### मलब्याखाली अनेकजण अडकले, एकाचा मृत्यू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४ मुंबई

मुंबईतून मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईच्या मध्य रेल्वे मार्गावरील मुलुंड येथे मेट्रोचा स्लॅब कोसळला आहे. या दुर्घटनेत एक ऑटो रिक्षा आणि चार चाकी गाडीवर स्लॅब कोसळला आहे. यामध्ये दोघेजण जखमी तर काहीजण अडकले असून एकाचा मृत्यू झाला आहे. दरम्यान जखमींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचे म्हटले जात आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

मुंबईतील मेट्रो प्रकल्पाच्या कामादरम्यान सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुलुंड (पश्चिम) येथील एलबीएस रोडवर मेट्रो पिलरचा सिमेंटचा एक मोठा भाग चालत्या रिक्षावर कोसळला. मेट्रोच्या खांबाचा काही भाग धावत्या रिक्षावर कोसळला असून यामध्ये अनेक जण जखमी झाले आहेत.

ही घटना दुपारी सुमारे १२.२० वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती अग्निशमन दलाकडून (चऋइ) देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलिस, मेट्रो प्रशासन, महापालिकेचे वॉर्ड कर्मचारी तसेच १०८ रुग्णवाहिका सेवा तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या.

बचावकार्य सुरू असून जखमींना तातडीने रुग्णालयात हलविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या दुर्घटनेमुळे एलबीएस रोडवरील वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. बांधकामाच्या सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून पुढील चौकशी सुरू आहे.

## कोर्टाने राज ठाकरेंच्या हिंदी भाषिकांविरोधात केलेल्या भाषणांचा तपशील मागवला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४मुंबई

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आलेल्या याचिकेच्या सुनवणीदरम्यान उच्च न्यायालयाने अमराठी भाषिकांविरोधात राज ठाकरेंनी तसेच त्यांच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या कथित द्वेषपूर्ण वक्तव्यांच्या घटनांची माहिती मागवली आहे. याचिकाकर्त्यांकडून या घटनांची माहिती मागवत उच्च न्यायालयाने सुनवणी तहकूब केली. उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी याप्रकरणी याचिका दाखल करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. याचिकाकर्ते सुनील शुक्ला यांनी याचिकेत त्यांच्या कार्यालयाची मानसैनिकांनी तोडफफोड केल्याचा तसेच समाज माध्यमांवर पोस्ट करून त्यांना धमकावण्यात आल्याचा हवाला दिला आहे. प्रसार माध्यमांवरील प्रतिक्रियांमुळे आणि मनसे आणि राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका केल्यानंतर धमक्यांचे सत्र वाढल्याचा सुनील शुक्ला यांचा दावा आहे.




#### त्यांना ठार मारण्याच्या धमक्या देणाऱ्या पोस्टचा उल्लेख

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे व त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी हिंदी भाषिकांविरोधात केलेल्या द्वेषपूर्ण भाषणांच्या कथित घटनांचा तपशील गुरुवारी मुंबई उच्च न्यायालयाने मागवला आहे. राज्यात 'उत्तर भारतीय विरोधी' मोहिमेला विरोध केल्याने आपल्याला लक्ष्य केले आहे, असा आरोप उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी याचिकेमध्ये केला आहे. मुख्य न्या. श्री चंद्रशेखर व न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढे गुरुवारी या याचिकेवर सुनावणी पार पडली. न्यायालयाने शुक्ला यांनी नमूद केलेल्या घटनांची माहिती अधिक तपशिलात न्यायलयाने मागवत ही सुनावणी तहकूब केली. याचिकेत २०२४-२५ मधील काही घटनांचा उल्लेख केला आहे. सुमारे ३० मनसेशी संबंधित व्यक्तींनी त्यांच्या पक्ष कार्यालयावर तोडफफोड करण्याचा प्रयत्न केल्याचा तसेच त्यांना ठार मारण्याच्या धमक्या देणाऱ्या पोस्टचा उल्लेख केला आहे.

#### त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना पोलिस संरक्षण मिळावे

शुक्ला यांनी राज ठाकरे व धमक्या देणाऱ्या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून तपास करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली. तसेच त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना पोलिस संरक्षण मिळावे. तसेच हे प्रकरण प्रलंबित असताना राज ठाकरे यांना प्रक्षोभक वक्तव्ये करण्यास मनाई करावी व पक्षाची मान्यता रद्द करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशा मागण्या शुक्ला यांनी याचिकेद्वारे केल्या आहेत.

## तिजोरीच्या चाव्या पुन्हा राष्ट्रवादीकडे? मुख्यमंत्र्यांनी घेतला निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४मुंबई

दिवंगत अजित पवार यांच्याकडील अर्थ खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाणार असल्याची माहिती खात्रीलायक सूत्राने दिली आहे. विधानसभेच्या अधिवेशनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्थ खात्याची जबाबदारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण तसेच औकाफ ही खाती त्यांच्याकडे सोपवण्यात आली. पण अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याकडे ठेवले होते. अर्थसंकल्प मांडल्यानंतर या खात्याचा कारभार पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २ ते ३ महिन्यात अर्थ खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसला दिले जाईल.

अजितदादा यांच्याकडे अर्थखात्याचा कारभार होता. त्यांनी आतापर्यंत ११ वेळा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यांच्या अकाली निधनानंतर या खात्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी आपल्याकडेच ठेवावी, असा निर्णय राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर झालेल्या चर्चेअंतीच ठरलं होतं. पण आता पुन्हा हे खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे दिले जाईल, असे सूत्रांनी सांगितलेय.

## सुनेत्रा पवार त्यांच्या दोन मुलांसह एका मोठ्या राजकीय रणनितीकाराला भेटल्या, कुठे झाली भेट?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४मुंबई

अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे अचानक सुनेत्रा पवार यांच्यावर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. मागच्या महिन्यात २८ जानेवारीला अजित पवार यांचं बारामती येथे विमान अपघातात निधन झालं. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात बऱ्याच घडामोडी घडल्या, अजूनही घडतायत. अजितदादांच्या निधनानंतर तीनच दिवसात सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या उपमुख्ममंत्री पदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या त्या गटनेत्या आहेत. भविष्यात पक्षाला एकसंध ठेऊन तो पुढे घेऊन जाण्याचं त्यांच्यासमोर मोठं आव्हान आहे. अजितदादांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा सुरु आहे. अजित पवारांच्या त्या संदर्भात शरद पवार पक्षाच्या नेत्यांसोबत बैठका पार पडल्या होत्या, असे दावे केले जात आहेत.



याच सगळ्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार त्यांची दोन मुलं पार्थ आणि जय पवार यांच्यासह राजकीय रणनितीकार नरेश अरोरा यांना भेटल्या. नरेश अरोरा यांची डिझाईन बॉक्स नावाची कंपनी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची प्रतिमा उंचावण्याची या डिझाईन बॉक्सवर जबाबदारी आहे. मागच्यावर्षी विधानसभा निवडणुकीत या डिझाईन बॉक्सनेच राष्ट्रवादीच्या प्रचार रणनितीची आखणी करण्यात महत्वाची भूमिका बजावली होती. राष्ट्रवादीला विधानसभेला जे यश मिळालं, त्यानंतर अजित पवार यांचा डिझाईन बॉक्सवरील विश्वास जास्त वाढला. नरेश अरोरा हे अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकीय सल्लागार आहेत.

काल पार्थ पवार, जय पवार आणि नरेश अरोरा यांच्यात अजितदादांच्या पुण्यातील जिजाई बंगल्यात एकतास चर्चा झाली. त्यानंतर हे तिघे लगेच पुण्यातील सर्किट हाऊसवर जाऊन सुनेत्रा पवार यांना भेटले. तिथे चौघांमध्ये तासभर चर्चा झाली. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या मुद्यासह, राज्यात ज्या घडामोडी घडतायत त्यावर चर्चा झाली. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडे राष्ट्रवादीची सूत्र आली आहेत.

## कोणी कितीही आदळआपट केली तरी ठाकरेंच्या युतीत मिठाचा खडा पडणार नाही - राऊतांनी सुनावलं

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१४मुंबई

चंद्रपूरमध्ये घडलेल्या घडामोडींवर शिवसेना- मनसेत जुंपल्याचे पहायला मिळत आहे. संजय राऊत आणि मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आरोप प्रत्यारोप केले आहेत. चंद्रपूरमध्ये ठाकरेंच्या नगरसेवकांना प्रत्येकी एक कोटी रुपये मिळाल्याचा खळबळजनक दावा संदीप देशपांडे यांनी केला होता. त्यानंतर संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत चंद्रपूरमधील स्थानिक राजकीय घडामोडींवर स्पष्टीकरण दिले. चंद्रपूर येथे जे घडले, त्यात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची कोणतीही भूमिका नाही, असे राऊतांनी ठामपणे सांगितले. चंद्रपूरमधील काही स्थानिक लोकांनी त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षाला अंधारात ठेवून काही निर्णय घेतले असावेत. पक्षाने या घडामोडींना कधीही समर्थन दिलेले नाही, असे त्यांनी अधोरेखित केले. तर त्यानंतर मनसे नेते संदीप देशपांडे यांनीही ठाकरेंच्या सेनेला सुनावलं. संदीप देशपांडे यांनी संजय राऊत यांच्या ५० खोक्यांच्या आरोपांवरून जोरदार प्रत्युत्तर दिलं. जनतेला ५० खोक्यांचे पुरावे सादर केल्यास चंद्रपूर येथील एक खोक्याचा पुरावा देणार असल्याचे ट्वीट त्यांनी केलं होतं.




आज संजय राऊत हे माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांना पुन्हा या घडामोडींवरून प्रश्न विचारण्यात आले. चंद्रपूरमध्ये जे घडलं त्यावर तुम्ही प्रतिक्रिया दिली, मग मनसेच्या नेत्यांनी प्रतिक्रिया दिल्या. त्यावर पुढचा अध्याय म्हणजे काल मनसेच्या नेत्यांनी तुमच्यावर आरोप केले आहेत. मुंबईत अनेक ठिकाणी शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्यांनी आम्हाला मदत केली नाही. अनेक ठिकाणी आम्हाला जागा मिळाल्या नाहीत, अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवार उभे केले गेले, अनेक ठिकाणी आमचे उमेदवार असताना एबी फॉर्म दिले गेले. अशी मनसेच्या कार्यकर्त्यांची, नेत्यांची भावना आहे. ही भावना राज ठाकरे यांच्यासमोरही व्यक्त करण्यात आली. या सर्व मुद्यावर संजय राऊतांनी स्पष्ट शब्दात उत्तर दिलं.

माझी राज ठाकरेंशी परवा चर्चा झाली. आम्ही बोललो. तुम्ही जे म्हणताय ( कार्यकर्ते बोलले त्याबद्दल), ते जेव्हा स्वत: मनसे प्रमुख राज ठाकरे बोलतील, तेव्हा आम्ही त्यावर आमची प्रतिक्रिया देऊ. आता जे कोण काय बोलतंय, बंद दाराआड, भिंतीआड, त्याच्यावर आम्ही का बोलू? एक लक्षात घ्या मनसे आणि शिवसेना यांची युती अतिशय घट्ट आहे. कोणी काहीही बोललं तरी त्या युतीमध्ये मिठाचा खडा काही पडणार नाही. कोणाची कितीही इच्छा असली तरी ठाकरे बंधूंच्या युतीत मिठाचा खडा पडणार नाही, याचा पुनरुच्चार राऊत यांनी केला.

संपादकीय ......

# राफेलचा सोर्स कोडही हवा...

*राफेल विमानाचे सोर्स कोड भारताकडे येत नाहीत तोपर्यंत आपल्याला त्या विमानांमध्ये स्वदेशी क्षेपणास्त्रे किंवा नवीन तंत्रज्ञान जोडण्यासाठी प्रत्येक वेळी फ्रान्सची संमती आणि त्यांच्या तांत्रिक मदतीवर अवलंबून राहावे लागेल.*

*भारतीय हवाई दलाच्या आक्रमक क्षमतेत आमूलाग्र बदल घडवून आणणार्या ११४ राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीचा मार्ग पूर्णतः मोकळा झाला आहे. १८ ते २० फेब्रुवारी २०२६ दरम्यान फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत दौर्यात या ३६.१ अब्ज डॉलर्सच्या म्हणजेच सुमारे १७०.३ अब्ज रुपयांच्या महाकरारावर स्वाक्षरी होण्याची दाट शक्यता आहे. भारताच्या हवाई संरक्षणाची दिशा आणि 'मेक इन इंडिया' या संकल्पनेची कसोटी पाहणारा एक महत्त्वाचा टप्पा आहे. यातील ८० ते ९० विमानांची निर्मिती प्रत्यक्ष भारतातच केली जाणार आहे. त्यासाठी फ्रान्समधील दसॉल्ट कंपनीच्या अनेक यंत्रणा भारतात येतील.या खरेदीतच २४ राफेल एफ ५ विमानांचा अतिरिक्त पर्याय आणि नागपूरमधे एयरफ्रेम कोन उत्पादन आणि विमान जोडणी सामील आहेत. नागपूरमधील दसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेडसह टाटा, महिंद्रा आणि डायनॅमॅटिक टेक्नॉलॉजी यांसारख्या देशी कंपन्यांना या प्रक्रियेत सामावून घेतले जाईल. नागपूरमध्ये उभारल्या जाणार्या या प्रकल्पामुळे देशांतर्गत एरोस्पेस क्षेत्रात एक नवी ऊर्जा निर्माण होईल. दरवर्षी २४ ते ३० विमानांची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामुळे फ्रान्समधील मूळ उत्पादन केंद्रालाही एक भक्कम जोड मिळेल. २०२८ च्या अखेरीस या विमानांची पहिली खेप हवाई दलाला मिळण्याची चिन्हे असून, स्थानिक स्तरावर देखभाल, दुरुस्ती, आधुनिकीकरणासाठी आवश्यक ती सर्व केंद्रे उभारली जाणार आहेत.*

*तथापि, या सगळ्यात 'सोर्स कोड' हस्तांतरणाचा मुद्दा हा तांत्रिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत कळीचा ठरला आहे. यापूर्वी घेतलेल्या ३६ राफेल विमानांच्या वेळी फ्रान्सने हा सोर्स कोड देण्यास स्पष्ट नकार दिला होता. सोर्स कोड म्हणजे विमानाच्या संपूर्ण कार्यप्रणालीवर नियंत्रण ठेवणारा डिजिटल मज्जासंस्थेचा भाग असतो. तो रडार, इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणाली आणि शस्त्रास्त्रांचा एकमेकांशी संवाद साधून देतो. हा कोड भारताकडे येत नाही, तोपर्यंत आपल्याला त्या विमानांमध्ये स्वतःची स्वदेशी क्षेपणास्त्रे किंवा नवीन तंत्रज्ञान जोडण्यासाठी प्रत्येक वेळी फ्रान्सची संमती आणि त्यांच्या तांत्रिक मदतीवर अवलंबून राहावे लागेल. आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीने हे तांत्रिक परावलंबित्व हा मोठा अडथळा ठरू शकतो. भारताला 'अस्त्र' किंवा 'रुद्रम' यांसारखी स्वदेशी क्षेपणास्त्रे राफेलला जोडायची असतील, तर सोर्स कोडवर भारताचे सार्वभौम नियंत्रण असणे ही अगत्याची अट असायला हवी. आर्थिक गणितांचा विचार करता १७० अब्ज रुपयांचा हा व्यवहार अवाढव्य वाटत असला, तरी संरक्षणासाठी लागणारा हा निधी एकाच वेळी दिला जात नाही.*

*पुढील १० ते १५ वर्षांच्या कालावधीत वार्षिक हप्त्यांच्या स्वरूपात ही रक्कम अदा केली जाईल. त्यामुळे हवाई दलाच्या इतर आधुनिकीकरण प्रकल्पांवर अचानक आर्थिक ताण पडणार नाही. सध्या हवाई दलाकडे केवळ २९ स्कॉड्रन्स शिल्लक आहेत, तर अधिकृत गरज ४२ स्कॉड्रन्सची आहे. आगामी काळात मिग-२१, जग्वार आणि मिराज यांसारखी जुनी विमाने निवृत्त होणार असल्याने निर्माण होणारी पोकळी भरून काढण्यासाठी राफेलचा हा ताफा एक भक्कम 'ब्रिज' म्हणून काम करेल. २०४० पर्यंत जेव्हा भारताची स्वदेशी 'तेजस एमके २' आणि 'एएमसीए'सारखी पाचव्या पिढीतील विमाने ताफ्यात पूर्णपणे दाखल होतील, तोपर्यंत राफेल हे भारतीय आकाशाचे रक्षण करणारे प्रमुख कवच असेल. या व्यवहारातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे राफेलची एफ ५ स्टँडर्ड ही प्रगत आवृत्ती. हे विमान भविष्यातील नेटवर्ककेंद्रित युद्धासाठी सज्ज असलेले एक मोठे व्यासपीठ आहे. ते मानवरहित विमानांना किंवा 'विंगमन' ड्रोन्सना हवेतच नियंत्रित करण्याची क्षमता बाळगून आहे. आधुनिक युद्ध तंत्राच्या काळात डेटा फ्यूजन आणि डीप स्ट्राईक क्षमता असलेल्या या विमानांमुळे भारताच्या आक्रमक शक्तीत कैकपटीने वाढ होईल. उत्तर आणि पश्चिम सीमेवरील वाढत्या लष्करी आव्हानांना तोंड देण्यासाठी हवाई दलाला आपल्या स्कॉड्रन्सची संख्या ५० पर्यंत वाढवण्याची आवश्यकता आहे. ९०० हून अधिक लढाऊ विमानांची गरज असलेल्या या महायज्ञात राफेलचा वाटा सर्वाधिक महत्त्वाचा ठरणार आहे.*

*अखेर, कोणत्याही लढाऊ विमानाची आयात ही त्या देशाच्या संरक्षणाची अंतिम उपलब्धी असू शकत नाही. राफेलसारख्या जागतिक दर्जाच्या विमानाची खरेदी ही केवळ सद्यस्थितीतील त्रुटी दूर करण्यासाठी आहे. खर्याअर्थाने तांत्रिक स्वातंत्र्य तेव्हाच मिळेल, जेव्हा देशांतर्गत डिझाईन, उत्पादन आणि प्रगत इंजिन तंत्रज्ञानावर आधारित एक सार्वभौम लढाऊ विमान परिसंस्था निर्माण होईल. आयात केलेली विमाने आपल्याला शस्त्रास्त्रे आणि सुट्या भागांच्या चक्रव्यूहात अडकवून ठेवू शकतात, ज्यामुळे औद्योगिक सार्वभौमत्व कमकुवत होण्याची भीती असते. त्यामुळे राफेलच्या निमित्ताने मिळणारे तंत्रज्ञान हे भारताला स्वतःची पाचव्या आणि सहाव्या पिढीची लढाऊ विमाने बनवण्यासाठीचे इंधन ठरायला हवे. राफेल हा भारतीय हवाई दलाच्या सामर्थ्याचा एक भव्य पाया आहे; पण आत्मनिर्भरता हेच या प्रवासाचे अंतिम उद्दिष्ट असायला हवे.*

*आज चीनकडे २,३०० हून अधिक लढाऊ विमाने आहेत आणि पाकिस्तानही हवाई दलाचे वेगाने आधुनिकीकरण करत आहे. अशावेळी राफेलची २५० पेक्षा जास्त विमानांपर्यंत पोहोचू शकणारी संभाव्य संख्या भारताला एकाच वेळी दोन आघाड्यांवर युद्ध लढण्यासाठी आवश्यक बळ प्रदान करेल. केवळ विमानांची संख्या वाढवणे हा उद्देश नसून, राफेलच्या प्रगत इलेक्ट्रॉनिक युद्ध प्रणालीमुळे शत्रूचे रडार निकामी करणे आणि लांब पल्ल्यावरून अचूक प्रहार करणे भारताला शक्य होईल. शेवटी, हा व्यवहार भारताच्या संरक्षण क्षेत्रातील केवळ एक आर्थिक गुंतवणूक नसून ती भविष्यातील तंत्रज्ञानाची पायाभरणी आहे. २०२६ च्या मध्यापासून सुरू होणार्या औपचारिक वाटाघाटींमध्ये भारतीय उद्योगांचा सहभाग अनिवार्य करण्यात आला आहे. यामुळे केवळ मोठ्या कंपन्यांनाच नव्हे, तर सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांनाही जागतिक पुरवठा साखळीचा भाग होण्याची संधी मिळेल. जेव्हा भारताची स्वतःची 'एएमसीए'सारखी पाचव्या पिढीची विमाने विकसित होतील, तेव्हा राफेलच्या माध्यमातून मिळालेले तांत्रिक ज्ञान आणि उत्पादन कौशल्य मैलाचा दगड ठरेल. आयात आणि स्वदेशी बनावटीचा हा सुवर्णमध्य साधूनच भारत २०४० पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी हवाई शक्ती बनण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल करू शकेल. राफेलच्या रूपाने भारतीय आकाशाला मिळालेले हे नवे 'ब्रह्मास्त्र' देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी सदैव सज्ज असेल.*

# ज्वारी - कणसातील अळ्यांचे नियंत्रण, मका - फुलोऱ्यात असल्याने सिंचन पुरवठा कसा कराल?

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी हंगामातील ज्वारी आणि मका पीक वाढीच्या अवस्थेत असून या काळात या दोन्ही पिकांचे व्यवस्थापन कसे करावे, फवारण्या काय कराव्यात, सिंचन सुविधा कशी करावी, याबाबत माहिती घेऊयात...




**रब्बी ज्वारी** -ज्वारी पीक कणसांमध्ये दाणे भरण्याची अवस्थेत आहे. अशावेळी काय काळजी घ्यावी, हे पाहुयात...

ज्वारी पिकाच्या फुलोरा ते दाणे पक्व होण्याच्या अवस्थेत कणसातील अळया या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते.

तसेच प्रादुर्भाव जास्त असल्यास झाड वाळते. अळया दुधाळ अवस्थेतील दाणे खातात. विष्ठेमुळे दाण्याची प्रत खराब होते. म्हणून २० अळया प्रति कणीस आढळल्यास, नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी २ मिली प्रति लिटर पाणी मिसळून याप्रमाणे फवारणी करावी.

पहिला पंधरवडा - पक्ष्यांपासून संरक्षण करावे (पक्षीथांबे /मचाण बसविणे).

**रब्बी मका**- मका पीक तुरे लागण्याच्या अवस्थेत असून या काळात पाणी देण्याचं नियोजन व्यवस्थित करता आले पाहिजे. ते कसं करायचं, समजून घेऊयात...

**सिंचन**- मक्याची पाने रुंद व लांब असतात. बाष्पीभवन क्रियेमुळे पानांतून अधिक पाणी बाहेर टाकले जात असल्याने या पिकास पाण्याची गरज अधिक असते. मका पीक पाण्याच्या ताणास संपूर्ण कालावधीमध्ये संवेदनशील आहे. संवेदनशील अवस्थांच्या वेळी पाण्याचा ताण पडू देऊ नये, अन्यथा उत्पादनात लक्षणीय घट येते. पीक फुलोऱ्यात आणि दाणे भरत असताना कमी अंतराने भरपूर पाणी द्यावे. म्हणजे कणसे भरण्यास मदत होते. मका फुलोऱ्यात असताना जमिनीत पाण्याचे प्रमाण कमी असल्यास स्त्रीकेसर बाहेर पडण्यास उशीर झाल्यामुळे बीजधारणा कमी होऊन उत्पादन घटते.

म्हणून पीक तुऱ्यावर आणि स्त्रीकेसर अवस्थेत असताना पाण्याची आवश्यकता अधिक असते.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन सेवा केंद्र, इगतपुरी.**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




# झोपण्यापूर्वी करावयाचा व्यायाम

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**


निरोगी राहण्यासाठी तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी दररोज पाच ते दहा मिनिटे भिंतीचा आधार घेऊन पाय वर करून झोपलात तर त्याचे शरीराला अनेक आश्चर्यकारक फायदे मिळतात. या साध्या स्थितीमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि थकवा दूर होण्यास मदत होते. हे आसन करण्यासाठी सर्वप्रथम शांतपणे जमिनीवर किंवा बेडवर झोपा आणि तुमचे दोन्ही पाय भिंतीचा आधार घेऊन वरच्या बाजूला सरळ करा. तुमचे नितंब भिंतीपासून थोडे मागे ठेवा जेणेकरून तुम्हाला आरामदायक वाटेल. नाकाने हळूहळू श्वास घ्या आणि शरीर पूर्णपणे शिथिल सोडा. शरीरावर कोणताही ताण किंवा जोर देऊ नका. हे आसन जेवणानंतर किमान दोन ते तीन तासांनी करावे आणि या पाच ते दहा मिनिटांच्या काळात मोबाईलचा वापर पूर्णपणे टाळावा.



# सोमवारी धारणीत 'बाबा महाकाल की शाही बारात..' मिरवणूक

## शिव-पार्वती विवाह प्रसंगाचे घडणार सजीव दर्शन

### सुश्री सुषमा जयशंकर गुप्ता यांचे सकल हिंदू समाजाला सहभागी होण्यासाठी भावनिक आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४धारणी-**

मेळघाटच्या पवित्र भूमीवर शिवभक्तीचा महासागर उसळणार असून, धारणी शहरात येत्या १६ फेब्रुवारी रोजी 'बाबा महाकाल की शाही बारात' या अभूतपूर्व, ऐतिहासिक आणि पौराणिक महत्त्वाच्या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. शिवरात्रीनिमित्त आयोजित होणाऱ्या या भव्य-दिव्य सोहळ्यामुळे संपूर्ण धारणी शहर भगव्या ध्वजांनी, पताकांनी आणि दिव्य रोषणाईने नटून उठणार आहे.या दिव्य आयोजनाचे प्रमुख संयोजक शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दल तथा सकल हिंदू समाज धारणी असून, सहसंयोजक म्हणून सिया के राम ग्रुप व इंजिनिअर अर्पण अनिल मालवीय योजक मित्र परिवार, होळी चौक धारणी सहभागी आहेत. या भव्य सोहळ्याची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, यासंदर्भात शहरातील पौराणिक आस्था केंद्र असलेल्या राम-हनुमान मंदिरात नुकतीच महत्त्वपूर्ण नियोजन सभा पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी राम-हनुमान मंदिर संस्थानचे पंडित धर्माचार्य सूर्यप्रकाश मिश्रा होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दलाच्या संस्थापक प्रमुख सुश्री सुषमा जयशंकर गुप्ता यांनी उपस्थिती लावली. यावेळी त्यांनी शिव-पार्वती विवाह प्रसंगाचे पौराणिक महात्म्य, सृष्टीतील चराचरात वास करणाऱ्या भोलेनाथांच्या करुणा, भक्ती, श्रद्धा आणि आस्थेचा गूढ अर्थ अत्यंत प्रभावी शब्दांत उलगडला.

शिव म्हणजे केवळ देवता नाही, तर तो चैतन्याचा, वैराग्याचा, करुणेचा आणि कल्याणाचा महास्रोत आहे. शिव-पार्वती विवाह हा धर्म, कर्तव्य, त्याग आणि समर्पणाचा आदर्श आहे. समाज एकत्र यावा, धर्मसंकल्प दृढ व्हावा आणि मानवतेचे पुनरुत्थान व्हावे, यासाठी हा सोहळा समर्पित आहे, असे मार्मिक उद्गार सुश्री सुषमा जयशंकर गुप्ता यांनी व्यक्त केले. यानंतर आयोजनाची संपूर्ण जबाबदारी शिवशक्ती हिंदू महिला धर्मरक्षक दलाच्या सदस्य, किशोरवयीन मुली, सकल हिंदू समाज, सिया के राम ग्रुप व इंजिनिअर अर्पण मालवीय मित्र परिवारातील उत्साही युथ तरुणाईवर सोपवण्यात आली असून, स्वतंत्र नियोजन समिती स्थापन करण्यात आली आहे.

शिवरात्रीचे पौराणिक महात्म्य अत्यंत दिव्य मानले जाते. याच दिवशी भोलेनाथांनी तपश्चर्येतून जागृत होऊन माता पार्वतीशी मंगल विवाह केला, असे शास्त्रात वर्णन आहे. हा विवाह केवळ दोन देवतांचा नाही, तर पुरुषार्थ, शक्ती आणि सृष्टीच्या संतुलनाचा संगम आहे. याच अद्वितीय प्रसंगाचे सजीव रूपांतर धारणीच्या रस्त्यांवर 'बाबा महाकाल की शाही बारात'च्या माध्यमातून साकार होणार आहे.ही ऐतिहासिक शाही बारात दुपारी ठिक २:०० वाजता विज वितरण कंपनी वसाहत, धारणी कोर्ट समोरील शिव मंदिर येथून आरंभहोणार आहे. त्यानंतर मिरवणूक राधा-कृष्ण मंदिर, दुर्गा माता मंदिर, राम-हनुमान मंदिर मार्गे बस स्टँड पुढील मघवा नाल्याजवळील भुतेश्वर महादेव मंदिर येथे पोहोचेल. व तेथे महाजलाभिषेक, शिवस्त्रोत पठण व महाआरतीनंतर या दिव्य सोहळ्याची सांगता रात्री ९:०० वाजताच्या दरम्यान होईल. मिरवणुकीदरम्यान शिव उपासकांसाठी सेवार्थी व दानदात्यांच्या वतीने ठिकठिकाणी शरबत, चहा-कॉफी, शीतपेय आणि मिनरल वॉटरची व्यवस्था करण्यात येणार आहे, जेणेकरून भक्तांना कोणतीही गैरसोय होऊ नये. तसेच ऐतिहासिक आणि दिव्य सोहळ्याचे प्रत्यक्ष साक्षीदार व्हावे, यासाठी समस्त सकल हिंदू समाज बांधव, महिला, किशोरवयीन मुली, युथ तरुणाई, आया-बहिणी व धर्मप्रेमींना आयोजक प्रमुख सुश्री सुषमा जयशंकर गुप्ता यांच्या वतीने भावनिक व जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

नियोजन सभेस उपस्थित मान्यवरराम-हनुमान मंदिर येथे पार पडलेल्या नियोजन सभेला नंदा गुप्ता, वंदना जावरकर, रेखा गुप्ता, वर्षा घन, सुरेखा पाण्डये, कुसुम मोरे, किरण लष्करी, गीता झारखंडे, सुरभी कास्देकर, गुड्डी घन, किरण कचोडेकर, राजलक्ष्मी, संगीता संधाने, झारेकरताई, निशा रुद्रे, मिना प्रजापती, तुलसा प्रजापती, कविता सेठमाणिक आदी महिलांसह इंजिनिअर अर्पण अनिल मालवीय, आयुष गुप्ता, आकाश राठौड, निलेश घारे, राहुल चव्हाण,कृष्णलाल मालवीय, अभिजित जैस्वाल, मनिष मालवीय, दिपक मालवीय, प्रफूल मालवीय, चिकु राठौड आदींसह मोठ्या संख्येने सकल हिंदू समाज बांधव उपस्थित होते.धारणीमध्ये १६ फेब्रुवारी रोजी श्रद्धा, भक्ती, परंपरा आणि संस्कृतीचा दिव्य संगम अनुभवण्यासाठी सर्व शिवभक्तांनी या ऐतिहासिक 'बाबा महाकाल की शाही बारात'मध्ये सहपरीवार सहभागी व्हावे, असे आयोजकांनी आवर्जून सांगितले आहे.

### शहरात घडणार भक्तीचा ऐतिहासिक रंगोत्सव

संपूर्ण धारणी शहर भगव्या ध्वजांनी, पताकांनी, रंगीबेरंगी आकाशदिव्यांनी, बॅनर्स, होर्डिंग्ज आणि आकर्षक स्वागतद्वारांनी सजवण्यात येणार आहे. परप्रांतीय कलानाट्य, धार्मिक-आध्यात्मिक झाकी आणि शिव-पार्वती विवाह प्रसंगाचे सजीव चित्रण हे या शाही बारातीचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. स्मशानाचे राजा, त्रिकालदर्शी, देवा-दी-देव महादेव आणि दक्षपुत्री माता पार्वती यांचा मंगलमय विवाह हुबेहुब साकार होताना पाहणे, हा केवळ उत्सव नव्हे तर आध्यात्मिक साक्षात्कार ठरणार आहे. बाबा महाकाल की शाही बारात या प्रसंगी शिवभक्तांना भक्ती, आनंद, श्रद्धा आणि आध्यात्मिक उन्नतीचा अद्वितीय अनुभव मिळणार आहे.

# मंत्री झिरवळ अंधारात अन् 'एसीबी' मंत्रालयात

## लाचखोर कारकुनाला ३ दिवसांची पोलिस कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १४मुंबई-** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील दुसर्या मजल्यावरील कार्यालयात घुसून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने धाडसी कारवाई करत झिरवळ यांचा कारकून राजेंद्र ढेरिंगे याला लाच घेताना अटक केल्याने एकाच वेळी मंत्री झिरवळ, त्यांच्या विभागाचा कारभार आणि मंत्रालयासारख्या सर्वोच्च यंत्रणेची इभ्रत चर्चेला आली आहे. मंत्री झिरवळ यांनी मात्र या लाच प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नाही, असे दिल्ली मुक्कामी निक्षून सांगितले आहे. मात्र, आरोपी कारकून राजेंद्र ढेरिंगेला शुक्रवारी न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. त्याच्या चौकशीत काय समोर येते याकडेही सर्वांचे लक्ष असेल.



राज्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या मंत्रालय कार्यालयातील लाचखोर लिपिक राजू संपत ढेरिंगे याला शुक्रवारी विशेष सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १६ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. त्याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू असून या चौकशीतून त्याच्या आणखी काही सहकार्यांची नावे समोर येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गृह विभागाच्या परवानगीनंतरच एसीबीच्या अधिकार्यांनी राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील कारकून राजेंद्र ढेरिंगे याच्यावर झडप घातली. मंत्रालयातील मंत्री कार्यालय किंवा अन्य कार्यालयात कारवाई करायची असेल तर गृह खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर यांची परवानगी घ्यावी लागते. त्यांनीच लाचलुचपत प्रतिबंधक खात्याला झिरवळ यांच्या मंत्री कार्यालयावर कारवाई करण्याची परवानगी दिली. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने केलेल्या कारवाईबाबत मंत्री झिरवळ यांना कोणतीही कल्पना म्हैसकरांच्या कार्यालयातून दिली गेली नाही. परवानगी मिळताच एसीबीच्या अधिकार्यांनी सोमवारपासून ढेरिंगेवर पाळत ठेवली होती. ढेरिंगे लाच मागत असल्याचे निश्चित होताच गुरुवारी सापळा रचण्यात आला.

मंत्रालयात एसीबीचे पथक झिरवळांच्या कार्यालयात धडकले तेव्हा मंत्री झिरवळ दिल्लीत होते आणि त्यांना या कारवाईची भनकदेखील एसीबीने किंवा म्हैसकरांच्या कार्यालयाने लागू दिली नाही. त्यामुळे या कारवाईचे सूत्रधार कोण, असा प्रश्न सध्या चर्चेत आहे. एसीबीचा सापळा यशस्वी व्हावा म्हणून ही खबरदारी घेण्यात आल्याचे सांगितले जाते. कारण एसीबीने अटक करताच लाचखोर कारकून राजू संपत ढेरिंगे याने मंत्री झिरवळ यांचे खासगी सचिव रामदास घाडे यांच्या सांगण्यावरून पैसे मागितले, असा जबाब प्राथमिक चौकशीत एसीबीला दिला आहे. मनीषा म्हैसकर यांनी या धाडीला परवानगी दिली असली तरी त्यासाठी राजकीय स्तरावर या कारवाईची सूत्रे कुणी हलवली, याचा अंदाज बांधणे सुरू आहे.

# टपाल विभागातर्फे आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अकोला-** टपाल विभागाच्या आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत ९ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रवर डाक अधिक्षक रामी रेड्डी यांनी केले आहे. ही स्पर्धा दि. ८ मार्चला होईल. शालेय स्तरावरही स्पर्धेचे ७ मार्चला आयोजन केले जाणार आहे. इंग्रजी किंवा कोणत्याही भारतीय भाषेत पत्र लिहीता येईल. कमाल शब्दमर्यादा ८०० आहे. इच्छूक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज २५ फेब्रुवारीपर्यंत प्रवर अधिक्षक विभागीय टपाल कार्यालय, अकोला या कार्यालयास जमा करावे. सर्कल स्तरावर २५ हजार, १० हजार व ५ हजार रू. आणि प्रमाणपत्र अशी बक्षीसे आहेत. राष्ट्रीय स्तर ५०, २५ व १० हजार रू. अशी पहिली तीन बक्षीसे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पत्रलेखनाची आवड निर्माण होण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बेचाळिसावा दीक्षांत समारंभ २३ रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा बेचाळिसावा दीक्षांत समारंभ सोमवार दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता विद्यापीठ परिसरात आयोजित करण्यात येत आहे. आजवर विद्यापीठाने एक्केचाळिस दीक्षांत समारंभाचे अतिशय उत्कृष्टपणे, शिस्तबद्ध व सुचारु पद्धतीने आयोजन केले आहे. तरी दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपन्न होत असलेल्या बेचाळिसाव्या दीक्षांत समारंभाची नोंद विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, पालक व विद्यार्थी तसेच सर्व संबंधितांनी घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६

शहर/ग्रामिण

# एसटी चालक-वाहक दारूच्या नशेत तर्रर्र

## प्रवाशांच्या जिवाशी खेळ; रोखण्यात आली बस

### खामगाव बसस्थानकात प्रवाशांनी रोखली बस, प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४खामगाव**

बसस्थानकात शुक्रवारी रात्री ९ वाजता दरम्यान घडलेली घटना म्हणजे एसटी महामंडळाच्या कारभारावर काळा डाग फासणारी ठरली आहे. परतवाडा येथून पुण्याकडे निघालेली एम. एच. १४ एलबी २३४४ क्रमांकाची लांब पल्ल्याची एसटी बस चालक आणि वाहक दोघेही दारूच्या नशेत असल्याचे उघड झाल्याने प्रवाशांमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली. प्रवाशांच्या जिवाशी थेट खेळ सुरू असल्याचे लक्षात येताच सजग प्रवाशांनी बस खामगाव बसस्थानकात थांबविली.



लांब पल्ल्याच्या बसमध्ये चढल्यानंतर चालक व वाहक यांची संशयास्पद वागणूक, बोबडे बोलणे आणि दारूचा तीव्र वास येत असल्याने प्रवाशांनी तत्काळ जाब विचारला. मात्र, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यामुळे प्रवाशांचा संताप अनावर झाला. आमच्या जीवाची किंमत नाही का? असा सवाल करत प्रवाशांनी वाहतूक नियंत्रकांकडे थेट तक्रार दाखल केली. खामगाव बसस्थानकातील उपस्थित वाहतूक नियंत्रक आणि अधिकाऱ्यांनी बसची पाहणी केली असता या बसमध्ये देशी दारूच्या बाटल्या आढळल्या. तसेच प्रवाशांचा संताप अनावर होत असल्याचे दिसून येताच नशेतील वाहक चालकांना सुरक्षित स्थळी हलविले. लांब पल्ल्याच्या प्रवासात शेकडो प्रवाशांचे प्राण धोक्यात घालणाऱ्या या गंभीर प्रकारामुळे एसटी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर जोरदार टीका होत आहे. बसस्थानकातील कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. मात्र, आश्चर्य म्हणजे तब्बल एक तास प्रवासी ताटकळत राहिले. अखेर एक तासानंतर चालक व वाहक बदलण्यात आल्यानंतरच बस पुढील प्रवासासाठी रवाना झाली. दरम्यान, याबाबत पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सांगत, संबंधितांनी या प्रकाराबाबत माहिती देण्याचे टाळले.

#### दोन ठिकाणी बसने दिले हेलकावे

खामगावकडे येताना मार्गावर या बसने दोन ठिकाणी अचानक हेलकावे दिल्याची माहिती प्रवाशांनी दिली. चालकाच्या असंतुलित वाहनचालनामुळे प्रवासी घाबरून गेले होते. काही प्रवाशांना थेट अपघात होणार असल्याची भीती वाटू लागली होती. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली; मात्र हा प्रकार अधिक गंभीर असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. या संपूर्ण घटनेमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) च्या सुरक्षिततेच्या आणि शिस्तीच्या दाव्यांची अक्षरशः पोलखोल झाली आहे. प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या मद्यधुंद चालक व वाहकांवर तत्काळ निलंबनासह कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.खामगाव बसस्थानकावरील घटनेचे छायाचित्र आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १ लाखांची मदत

## सात वारसांना धनादेश वितरण




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अंजनगाव सुर्जी**

तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देण्यासाठी तहसील कार्यालयात मदत धनादेश वितरणाचा कार्यक्रम पार पडला. संकटात सापडलेल्या बळीराजाच्या कुटुंबीयांना शासनाच्या योजनेंतर्गत दिलासा देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.शेतकरी हा देशाचा कणा असून कृषीप्रधान व्यवस्थेत त्याचे योगदान अनन्यसाधारण आहे. मात्र नैसर्गिक आपत्ती, आर्थिक अडचणी आणि कर्जबाजारीपणामुळे काही शेतकऱ्यांना टोकाचे पाऊल उचलावे लागते. अशा परिस्थितीत त्यांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत मिळावी, यासाठी शासनाकडून विविध योजना राबवल्या जातात. त्याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील सात बाधित शेतकरी कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.हा धनादेश तहसीलदार मा. सोळंके मॅडम यांच्या शुभहस्ते वितरित करण्यात आला. कार्यक्रमास स्थानिक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. मदत प्राप्त लाभार्थींमध्ये गीता गणेश खोडे (रा. कापुसतळणी), पद्मा प्रभुदास खलोकार (रा. टाकरखेडा मोर), लता पुरुषोत्तम घोगरे (रा. खिरगव्हाण), शालिनी गजानन गोळे (रा. हंतोडा), शंकुतला गणेश घडेकर (रा. एकलारा), अलका संजय घोगरे (रा. चिंचोली बु.) आणि बंडू महादेव घिये (रा. आडगाव खाडे) यांचा समावेश आहे.कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या वेदना समजून घेत शासन व प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, असा विश्वास व्यक्त केला. मदतीची ही रक्कम संबंधित कुटुंबांच्या दैनंदिन गरजा, मुलांचे शिक्षण आणि इतर आवश्यक खर्च भागविण्यास उपयोगी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी मा. महेंद्रभाऊ दिपटे (उपजिल्हाप्रमुख, शिवसेना) तसेच शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकरी बांधवांचीही उपस्थिती होती.शासनाच्या अशा उपक्रमांमुळे संकटग्रस्त कुटुंबांना मानसिक व आर्थिक आधार मिळत असून समाजानेही अशा कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे, असे मत व्यक्त करण्यात आले. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आर्थिक नसून सामाजिक आणि मानसिक स्तरावरही त्यांना आधार देणे महत्त्वाचे आहे.अंजनगाव सुर्जी तालुक्यातील या मदतवाटप उपक्रमामुळे बाधित कुटुंबांना दिलासा मिळाला असून प्रशासनाच्या माध्यमातून मदतीची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली. संकटाच्या काळात शासनाकडून मिळणारी ही मदत म्हणजेच बळीराजाच्या कुटुंबासाठी आशेचा किरण ठरत आहे.

# सापन नदीपात्रात मादा बिबट्याचा मृत्यू

## विद्युत सापळ्याचा संशय, वनविभागाचा तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१४अचलपूर :**

अचलपूर तालुक्यातील निजामपूर गावालगत सापन नदीच्या पात्रातील झुडपात एक मादा बिबट मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. शुक्रवारी (दि. १३ फेब्रुवारी) सकाळी गावकऱ्यांना ही घटना दिसून आली. माहिती मिळताच पोलीस पाटील व वनविभाग घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करण्यात आला आहे.विद्युत सापळ्याचा संशयप्राथमिक माहितीनुसार, ससा किंवा सायल यांच्या शिकारीसाठी लावलेल्या बारीक तारांच्या सापळ्याला विद्युत जोड देण्यात आला होता. त्याच सापळ्याचा स्पर्श झाल्याने भक्ष्याच्या शोधात आलेल्या मादा बिबट्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर संबंधितांनी विद्युत तार काढून नेल्याची चर्चा असली तरी अधिकृत पुष्टी झालेली नाही.तपास वेगातवनविभागाने मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला असून अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. घटनास्थळावरील पुरावे, जखमा व इतर बाबींची सखोल चौकशी सुरू आहे. शिकारीचा प्रकार आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे.दरम्यान, परिसरात आधीपासून बिबट्याच्या वावराची चर्चा होती. या घटनेमुळे वन्यजीव सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून नागरिकांना संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ देण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.



# कुपोषणग्रस्त मेळघाटावर पुन्हा जलसंकटाचे सावट

## अतिदुर्गम पाड्यांवर विहिरींची पातळी झपाट्याने खालावली

### 'हर घर नळ से जल' योजनेसमोर अस्तित्वाचा प्रश्न, ५० गावखेड्यामध्ये भीषण टंचाईची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४धारणी –** कुपोषण, दळणवळणाच्या अडचणी आणि विकासाच्या मर्यादा यांसारख्या गंभीर समस्यांशी झुंज देणाऱ्या मेळघाटावर आता पुन्हा एकदा जलसंकटाचे गडद सावट दाटू लागले आहे. उन्हाळ्याची चाहूल लागताच आदिवासीबहुल धारणी आणि चिखलदरा या दोन्ही तालुक्यांतील विहिरींच्या पाण्याची पातळी चिंताजनकरीत्या खालावत असून, येत्या काही आठवड्यांत अनेक विहिरी अक्षरशः कोरड्या ठाक पडण्याची भीती व्यक्त होत आहे. परिणामी, आधीच विविध संकटांनी ग्रासलेल्या आदिवासी समाजामध्ये भीती, अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना तीव्र होत चालली आहे. डोंगरदऱ्यांनी वेढलेल्या आणि नैसर्गिकदृष्ट्या संवेदनशील असलेल्या मेळघाटाच्या भौगोलिक रचनेमुळे पाणी साठवणुकीची क्षमता मर्यादित आहे. मुरमाड, खडकाळ आणि उताराची जमीन असल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वेगाने वाहून जाते. त्यामुळे भूजलसाठा अपेक्षित प्रमाणात वाढत नाही. नद्यांवरील लहान बंधारे आणि जलसाठे उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच आटू लागतात. परिणामी, संपूर्ण परिसरातील विहिरींचे पाणी लवकर संपते आणि उन्हाळ्याच्या मध्यावर पाणीटंचाईची तीव्रता भयावह स्वरूप धारण करते. विशेषतः एकताई, हतरू, चिलाटी, राहू, बिबा, खडीमल, घाना, कवडाझिरी, राणीगाव, रायपूर, चौराकुंड, तारुबांदा, चिखली, यांसारख्या दुर्गम व अतिदुर्गम गावांसह जवळपास ५० हुन अधिक गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट उभे ठाकण्याची दाट शक्यता आहे. अनेक ठिकाणी विहिरींची पातळी आधीच तळाला पोहोचली असून, उन्हाळा वाढताच परिस्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर महिलांना पुन्हा एकदा डोक्यावर घागर घेऊन मैलोनमैल पायपीट करण्याची वेळ येणार का, असा हृदयद्रावक प्रश्न उपस्थित होत आहे.



दरम्यान, केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'हर घर नळ से जल' या जलजीवन मिशनअंतर्गत अमरावती जिल्हा परिषदेमार्फत घराघरात नळजोडणी, पाण्याच्या टाक्या, विहिरी आणि पाइपलाईन उभारण्यात आल्या आहेत. या योजनेमुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची सुविधा पोहोचल्याचे चित्र दिसत असले, तरी पाण्याचा मूळ स्रोतच आटत असल्याने संपूर्ण यंत्रणा निष्प्रभ ठरण्याची भीती निर्माण झाली आहे. गावांमध्ये नळ आहेत, पाइपलाईनचे जाळे आहे, टाक्या उभ्या आहेत; मात्र त्या टाक्यांमध्ये पाणीच नसेल, तर या सर्व सुविधांचा उपयोग काय? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

पाणीटंचाईचा परिणाम केवळ पिण्याच्या पाण्यावर मर्यादित राहत नाही, तर त्याचे गंभीर परिणाम आरोग्य, स्वच्छता, शेती, पशुपालन आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही होतात. महिलांचा मोठा वेळ पाणी आणण्यात खर्च होतो, तर शाळकरी मुलांनाही पाण्यासाठी मदत करावी लागते. स्वच्छतेच्या अभावामुळे संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक समस्या नसून सामाजिक, आर्थिक आणि आरोग्याशी निगडित गंभीर संकट ठरते.स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली आहे. नदी-नाल्यांवर बंधारे (चेकडॅम) उभारणे, भूजल पुनर्भरण प्रकल्प प्रभावीपणे राबविणे, डोंगराळ भागासाठी विशेष जलसंधारण योजना लागू करणे, जलसाठ्यांचे वैज्ञानिक सर्वेक्षण करून क्षमता वाढविणे आणि मेळघाटासाठी स्वतंत्र व शाश्वत जलव्यवस्थापन धोरण तयार करणे अत्यावश्यक असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत.तज्ज्ञांच्या मते, मेळघाटासाठी दीर्घकालीन जलनियोजनाशिवाय या संकटातून कायमस्वरूपी सुटका होणे शक्य नाही. केवळ पायाभूत सुविधा उभारून चालणार नाही, तर पाण्याचा शाश्वत स्रोत निर्माण करणे आणि जलसंधारणावर भर देणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पाण्यासाठी संघर्ष, असंतोष आणि प्रशासनाविषयी नाराजीचे वातावरण निर्माण होत राहील.सध्या परिस्थिती नियंत्रणात असली, तरी पाण्याची पातळी झपाट्याने खालावत असल्याने येत्या काळात भीषण जलसंकट उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने वेळीच ठोस आणि प्रभावी पावले उचलली, तर संकटाची तीव्रता कमी होऊ शकते; अन्यथा मेळघाटातील आदिवासी बांधवांना पुन्हा एकदा 'थेंबथेंबासाठी संघर्ष' करावा लागेल, हेच कटू वास्तव ठरेल.मेळघाटाच्या डोंगरदऱ्यांतून उमटणारी ही पाण्याची हाक केवळ स्थानिकांची वेदना नसून शासनव्यवस्थेला जागे करणारी गंभीर इशारा घंटा आहे. आता प्रश्न एकच, योजना कागदावर टिकणार, की प्रत्यक्षात मेळघाटाच्या मातीत जीवनदायी पाण्याची धार कायम वाहणार?-

# ओव्हरलोड ट्रकच्या धडकेने आगीचे गोळे खाली पडले

## मोठी घटना होता होता टळली : पोलीस कार्यवाही गरजेची होती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अंजनगाव सुर्जी**

स्थानिक वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाजवळील बोराळा रस्त्यावर एका ओव्हरलोड असलेल्या ट्रकचा विद्युत तारांना स्पर्श झाल्याने रस्त्यावर आगीचे गोळे रस्त्यावरील नागरिक भयभीत झाले होते.

याबाबत माहिती अशी की, दिनांक १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आठ ते साडेआठ वाजताच्या दरम्यान बोराळा रस्त्याकडून अंजनगाव मार्गावर मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला ट्रक क्रमांक चक- ४१-छ ५२७५ क्रमांकाच्या ट्रकने वीज वितरण कंपनीच्या कार्यालयाच्या बाजूला असलेल्या बोराळा रस्त्यावरील एल टी ४४० होल्ड असलेल्या विद्युत तारांना ट्रक मध्ये असलेल्या रुईच्या गठानांचा प्रचंड ओव्हरलोड मालाचा स्पर्श झाल्याने रस्त्यावर विजेच्या आगीचे खाली गोळे पडले. त्यामुळे रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारक तसेच रस्त्यावरील नागरिक आणि महिलांमध्ये एकच भीती निर्माण झाली होती.

या ओव्हरलोड ट्रकमुळे झालेल्या विद्युत तारांच्या स्पर्शामुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता सुद्धा निर्माण झाली होती. ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी आजूबाजूला दुचाकी वाहने सुद्धा उभी होती. रस्त्यावर येणारेजाणारे महिला, पुरुष लहान मुलं सुद्धा होते. अतिशय गंभीर स्वरूपाची घटना होता होता टळली. विद्युत तारेच्या स्पर्शाने स्टेट बँकेची डीपी सुद्धा बंद पडली होती. घटनेच्याच बाजूला वीज वितरण कार्यालय असल्याने तेथील कर्मचारी दीपक गावंडे, ऋषिकेश पवार, गणेश नागापुरे, विवेक वानखडे, ऋषिकेश पालखेडे हे तातडीने धावून आले. त्यांनी ट्रक चालकाला खडसावले तसेच तुटलेल्या तारांबाबत झालेले नुकसान भरून देण्यास सांगितले. यादरम्यान ट्राफिक पोलीस कर्मचारी राजू मेसरे व त्यांचे सहकारी कासदेकर घटनास्थळी आले. त्यांना सुद्धा मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला ट्रक दिसून आला या ट्राफिक पोलीस कर्मचाऱ्यांनी ट्रक नंबर चा फोटोकाढून त्याला चालान दिल्याचे समजते.


#### कडक कार्यवाही गरजेची होती

कापसाच्या रुईच्या गठानाने मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड असलेला या ट्रक क्रमांक चक- ४१ -ण ५२७५ असलेल्या जड वाहनाविरुद्ध कडक कार्यवाही करणे ट्राफिक पोलिसांनी गरजेचे होते. अशी नागरिकांमध्ये चर्चा होती. सदर ओव्हरलोड ट्रकमुळे मोठी घटना होणार होती. ट्रकला मोठी आग सुद्धा लागली असती. उपस्थित नागरिकांनी आरडाओरोड केल्यामुळे ट्रकचालक सावध झाला.

#### बोराळा रस्त्यावर जड वाहनांची वाहतूक

बोराळा येथील गणेश मंदिराकडे जाणारा रस्ता हा लहान आहे. या रस्त्यावरून श्री. गणेश मंदिराकडे आबाल, वृद्ध, स्त्री पुरुष दर्शना करिता पायी जातात काही भाविक दुचाकी वाहनाने जातात तसेच सदर रोडने बोराळा गावाकडे जाणारे येणारे प्रवासी सुरू असतात.सदर रोडवर जिनिंग प्रेसिंग आहेत. त्यामुळे या रोडवर सर्रासपणे जड वाहतूक सुरू झाली आहे. या जड वाहतुकीमुळे रस्ता सुद्धा खराब होत आहे. भविष्यात या रोडवर अशा या जड वाहनांमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पोलिसांनी याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

# येवदा अतिक्रमण हटविले



## बसस्थानक व महामार्ग परिसरात प्रशासनाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती** अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या येवदा बसस्थानक व राष्ट्रीय महामार्गालगतच्या अतिक्रमणांवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल प्रशासन आणि पोलिसांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. मात्र काही ठिकाणी अतिक्रमण कायम असल्याचे निदर्शनास आल्याने प्रशासनाने थेट कारवाई सुरू केली. जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याच्या हद्दीतील शेड, पत्रे व तात्पुरती बांधकामे हटविण्यात आली. कारवाईदरम्यान काही व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपले साहित्य हटवले, तर काही ठिकाणी प्रशासनाला यंत्रणांच्या मदतीने अतिक्रमण काढावे लागले. परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.कारवाईमुळे येथील व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण होते. पोटापाण्याच्या व्यवसायावर गदा आल्याने मजुरी दाखल होत असलेली कमाई बंद झाली त्यामुळे बेरोजगारीची वेळ आल्याचे मत काहींनी व्यक्त केले.

# रेकॉर्डवरील गुन्हेगार तलवारीसह ताब्यात

## एमआयडीसी व माया नगर चौक परिसरात दहशत पसरवित असताना अटक; आर्म ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल, गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती,** शहरात अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या इसमांवर कारवाई करण्याचे आदेश मा. पोलीस आयुक्त, अमरावती यांनी दिल्यानंतर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत एका रेकॉर्डवरील गुन्हेगारास धारदार तलवारीसह ताब्यात घेतले.पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पथक अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार एक रेकॉर्डवरील गुन्हेगार एमआयडीसी व माया नगर चौक परिसरात रात्रीच्या वेळी हातात लोखंडी धारदार तलवार घेऊन नागरिकांना धाक दाखवत दहशत पसरवत असल्याचे समजले.मिळालेल्या माहितीनुसार पथकाने सापळा रचून बादल किशोर लुंड (वय २६, रा. माया नगर, सुतगिरणी रोड, अमरावती) यास ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने संबंधित तलवार बगिया टी पॉइंटजवळील झाडाझुडपांत लपवून ठेवल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या सांगण्यावरून एक धारदार लोखंडी तलवार जप्त केली.या प्रकरणी पोलीस स्टेशन बडनेरा येथे आरोपीविरुद्ध कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर आरोपी हा यापूर्वी १८ महिन्यांसाठी तडीपार करण्यात आला होता. तसेच तो बडनेरा पोलीस स्टेशनमधील अप. क्र. ४५/२६ मधील विविध कलमांखाली फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आह



# १.५० लाखांच्या १२ ग्रॅम एमडीसह एकास अटक

## अकॅडमी ग्राऊंडवर गुन्हे शाखेची मोठी कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–**
शहरातील ड्रग्ज तस्करांविरुद्ध गुन्हे शाखेची कारवाई सुरूच आहे. शुक्रवारी, गुन्हे शाखेच्या पथकाने नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अकॅडमी ग्राउंड परिसरात छापा टाकत सोनू उर्फ समीर खान शमीम खान (१९, गवळीपुरा) याला एमडी ड्रग्ज विकताना रंगेहाथ अटक केली. आरोपींकडून पोलिसांनी १२ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले, ज्याची किमत अंदाजे १.५० लाख रुपये आहे. माहितीनुसार, आरोपी सोनू उर्फ समीर खानविरुद्ध मागील गुन्हे शाखेच्या कारवाईत ड्रग्ज तस्करीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तो बराच काळ फरार असल्याचे वृत्त होते आणि त्याने न्यायालयातून अटकपूर्व जामीनही मिळवला होता. तरीही, शुक्रवारी रात्रीच्या कारवाईत तो ड्रग्ज विकताना पकडला गेला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सोनू उर्फ समीर खान हा होंगा कंपनीचा सदस्य असल्याचे सांगितले जात आहे. शुक्रवारी त्याच्या ठावठिकाणाविषयी माहिती मिळाल्यानंतर, गुन्हे शाखेने सोनू उर्फ समीरला अटक केली. पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चौहान यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाईकरण्यात आली. पथकात एपीआय मनीष वाकोडे, सतीश देशमुख, फिरोज खान, प्रशांत मोहोड, सुधीर गुढे, संदीप खंदारे, नजीमुद्दीन, रणजीत गावंडे आणि मंगेश लोखंडे यांचा समावेश होता.

गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे शहरातील ड्रग्ज तस्करांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. शुक्रवारी रात्रीच्या कारवाईदरम्यान, पोलिस पंचनामा प्रक्रिया पूर्ण करत असताना, काही लोक घटनास्थळी जमले. आरोपीला गाडीत बसवले जात असताना, लोकांनी पोलिसांच्या कारवाईचे कौतुक केले आणि म्हणाले, साहेब, त्याला अटक करण्याऐवजी त्याला गोळ्या घाला म्हणजे तो इतरांचे जीवन आणि कुटुंबे उध्वस्त करू शकणार नाही.

### आणखी ड्रग्ज तस्कर उघड

माहितीनुसार, अटक केलेला आरोपी सोनू उर्फ समीर खान हा शमीम खान होंगा यांचा मुलगा असल्याचे सांगितले जात आहे. या अटकेनंतर होंगा कंपनीशी संबंधित इतर ड्रग्ज तस्करांची नावे उघड होण्याची अपेक्षा आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणात मोठी कारवाई करण्याचा दावा केला जात आहे.

# अमरावतीत २४ फेब्रुवारीला मालमत्ता कर विषयक विशेष जनसंवाद

## प्रलंबित मालमत्ता कर तक्रारींच्या निवारणासाठी महानगरपालिकेचा पुढाकार

**मालमत्ता कर तक्रारींसाठी नागरिकांना थेट सुनावणीची संधी**



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–**
अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर संदर्भातील मोठ्या प्रमाणात तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. झोन तसेच मुख्य कार्यालय स्तरावर या तक्रारींचे निवारण अपेक्षित प्रमाणात न झाल्यामुळे मालमत्ता कर वसुली प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका कार्यालय, राजकमल चौक येथे मालमत्ता कर संदर्भातील जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या जनसंवाद कार्यक्रमात मालमत्ता करासंबंधी प्रलंबित तक्रारी, नोंद दुरुस्ती, थकबाकी, कर आकारणी आदी विषयांवर प्रत्यक्ष सुनावणी करून तत्काळ मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात येणार आहे.

मालमत्ता धारकांनी आपल्या तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन मालमत्ता कर विषयक समस्या मार्गी लावाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# काटआमला येथे 'गावभेट' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ग्रामस्थांच्या समस्यांवर प्रशासनाचा थेट संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती,**
शासनाच्या विविध कल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी आणि प्रशासनाने थेट जनतेच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशान्वये 'गावभेट' उपक्रम राबविण्यात येत आहे. अमरावती तालुक्यातील काटआमला येथे 'गावभेट' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीमती प्रज्वल मिलके होत्या. यावेळी प्रा. अनिरुद्ध पाटील यांनी महिलांच्या समस्या व कायदेविषयक मार्गदर्शन केले. शेतीतज्ज्ञ प्रा. आर. के. पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले. महसूल व इतर विभागांच्या वतीने उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे, सुनील राणा, नायब तहसीलदार सुनील रासेकर यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. या उपक्रमाची सुरुवात वृक्षदिंडीने झाली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर गावात 'शिवारफेरी' काढण्यात आली. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांना भेटी देण्यात आल्या, तसेच 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता' योजनेअंतर्गत अडथळा असलेला एक पाणंद रस्ता मोकळा करण्यात आला.

सभेत ग्रामस्थांच्या विविध मागण्या व तक्रारी जाणून घेण्यात आल्या. उपस्थित अधिकाऱ्यांनी या समस्या प्राधान्याने सोडविण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. शाळेतील बालकलाकारांनी पर्यावरण संवर्धन, 'पाणी अडवा-पाणी जिरवा' आणि वृक्ष लागवड या विषयावर नाटक सादर केले. शासन आणि ग्रामस्थ यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्यासाठी आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हा गावभेट उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

# उर्ध्व वर्धा कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची पाणी आरक्षणास मंजुरी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–**
जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समिती व पाणी आरक्षणाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी उर्ध्व वर्धा प्रकल्पातून सोडण्यात येणाऱ्या पाणी आवर्तनाचे नियोजन आणि बिगर सिंचन पाणी आरक्षणाबाबत चर्चा करून विविध निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे लाभक्षेत्र अमरावती आणि वर्धा या दोन्ही जिल्ह्यांत असून, प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यांमधून रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता मनीष राजभोज यांनी बैठकीत माहिती दिली की, रब्बी हंगाम २०२५-२६ साठी एकूण ३१ हजार हेक्टर सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत या दोन्ही कालव्यांद्वारे ३ पाणी पाळ्यांची आवर्तने पूर्ण झाली असून, त्यातून १० हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन झाले आहे. उर्वरित २ आवर्तने मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, जलसंपदा व कृषी विभागाने समन्वय साधून उन्हाळी पिकांच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी यावेळी दिले.

या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी बिगर सिंचन पाणी आरक्षणासही मंजुरी प्रदान करण्यात आली. यामध्ये पिण्यासाठी ६१.९११ दलघमी, औष्णिक वीज केंद्रासाठी २५.००० दलघमी आणि संभाव्य औद्योगिक पाणीपुरवठ्यासाठी २.५० दलघमी असे एकूण ८९.४११ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. बिगर सिंचन ग्राहक पाणीपुरवठा योजनेची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, संबंधित यंत्रणांनी मार्च २०२६ पूर्वी ही थकबाकी वसूल करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला दूरदृष्य प्रणालीद्वारे विधानपरिषद सदस्य दादारावजी केचे उपस्थित होते. सर्व लाभधारकांना विहित वेळेत पाणी पोहोचण्याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी निर्देश दिले. बैठकीस उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत, जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक एस. पी. देशमुख, कार्यकारी अभियंता अमोल गुरव, गु. उमप यांच्यासह उर्ध्व वर्धा सिंचन मंडळाचे सर्व उपविभागीय अभियंता उपस्थित होते.

# सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याच्या अत्यावश्यक संचाच्या वाटपाबाबत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती,**
जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदणीकृत जिवंत (सक्रिय) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी रेणुका बिहार, खसरा क्र. २९, एम. झेड. ढाबा, नांदगाव खंडेश्वर रोड, जि. अमरावती येथे सुरू करण्यात आले आहे. परंतु जिल्ह्यातील एकूण १४ तालुक्यांमधील कामगारांना या ठिकाणी येऊन गृहपयोगी संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच घेऊन जाणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने सोयीचे नाही. वाटपाच्या ठिकाणी दररोज सुमारे ३ हजार कामगारांना संच वाटपासाठी ऑनलाईन अपॉइंटमेंट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गर्दी व गोंधळ होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. यासाठी सक्रीय बांधकाम कामगारांना वितरीत करण्याच्या गृहपयोगी वस्तू, सुरक्षा व अत्यावश्यक संचाच्या वाटप तात्काळ बंद करण्यात येत आहे. याबाबत सर्व कामगारांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केल आहे.

तसेच तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पोलीस विभाग यांच्याशी समन्वय साधून योग्य ते नियोजन करुन साहित्य वाटपाची कार्यवाही सुरू करण्यात येईल. भविष्यात तालुका स्तरावर एका दिवशी जास्तीत जास्त ५०० बांधकाम कामगारांना साहित्य वाटप करण्यात यावे, तसेच कोणतेही वाटप सुरू करण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५६ नुसार बांधकाम कामगारांना वितरित करण्यात येणाऱ्या गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वाटप करतांना कोणतीही जिवीत व वित्त हानी होणार नाही, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. याबाबत कोणतीही कुचराई आढळून आल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी हे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५६ नुसार कार्यवाहीस पात्र राहील याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केल आहे.


# सिपेट अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**
केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट), रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायन व खते मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत असलेली राष्ट्रीय स्वायत्त संस्था असून महाराष्ट्रातील प्लास्टिक उद्योगांना तांत्रिक सहाय्य, कुशल मनुष्यबळ निर्मिती तसेच संशोधन व विकास कार्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर येथे सिपेट केंद्राची स्थापना सन २००६ मध्ये करण्यात आली आहे. सिपेट संस्था आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त असून येथे एआयसीटीई, मान्यताप्राप्त व एमएसबीटीई समतुल्य प्लास्टिक इंजिनीयरिंगचे विविध अभ्यासक्रम राबविले जातात. सिपेटमध्ये प्रवेशासाठी दरवर्षी ऑल इंडिया लेव्हल सिपेट अँडमिनीस्ट्रेटर टेस्ट आयोजित करण्यात येते व गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून, सिपेट प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन नोंदणी https://cipet26.onlineregistrationform.org/CIPET/ या संकेतस्थळावर सुरु आहे. ही प्रवेश परीक्षा दि. ७ जून २०२६ रोजी घेण्यात येणार असून प्रवेश अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २८ मे २०२६ आहे.

यावर्षी दहावी, बारावी, डिप्लोमा व बी.एस्सी. (अंतिम वर्ष)ची परीक्षा देणारे विद्यार्थी निकालाची प्रतीक्षा न करता प्रवेश अर्ज भरू शकतात. सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिपेटचे प्रशिक्षण प्रमुख आर. जीवन राम यांनी केले आहे.

# सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळल्यास ५ हजाराचा दंड

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**
सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळणे तसेच रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर ५ हजाराचा दंड ठोठावून कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा ईशारा महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी दिला आहे.

अमरावती शहरातील सर्व सर्व नागरिक, व्यावसायिक व संस्था यांचे करिता महानगर पालिका द्वारे आवाहन करण्यात येत आहे कि, सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट रुल्स २०१६ अन्वये अमरावती शहरातील सर्व प्रभागांमध्ये घराघरातून दैनंदिन कचरा संकलनासाठी नियमित घंटागाडी सेवा सुरू आहे.तथापि, काही सार्वजनिक ठिकाणी तसेच मुख्य रस्त्यावर नागरीक / व्यावसायिकाकडून कचरा टाकणे व उघड्यावर कचरा जाळत असल्याचे आढळून येत आहे. सदर कृती कायद्याने पूर्णतः प्रतिबंधित असून पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यास घातक आहे.आरोग्य व पर्यावरण दृष्टीने कचरा जाळल्यामुळे विषारी धूर निर्माण होऊन दमा, श्वसनाचे विकार व इतर आजार वाढतात. वातावरणातील प्रदूषण वाढून नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.कोणीही व्यक्ती / व्यावसायिक कचरा जाळत असल्याचे आढळल्यास संबंधित माहिती (ठिकाण, फोटो, नाव असल्यास) महानगरपालिकेच्या अधिकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक ७०३००९२६४८ वर पाठवावी. त्याकरिता तक्रारदाराचे नाव व मोबाईल नंबर गोपनीय ठेवण्यात येईल. असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

नागरिकांना आवाहन

१) घंटागाडीमध्येच दैनंदिन कचरा टाकण्यात यावे.

२) सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत कचरा टाकू नये.

३) कोणत्याही परिस्थितीत कचरा जाळू नये.

स्वच्छ, सुंदर व निरोगी अमरावतीसाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे. असे आवाहन महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा यांनी केले आहे.

# जागतिक कौशल्य स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीत अमरावतीची बाजी

## विजेत्यांच्या जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या हस्ते सत्कार, चार विजेत्यांनी उंचावला जिल्ह्याचा नावलौकिक

**विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** जागतिक कौशल्य स्पर्धेच्या राज्यस्तरीय फेरीत जिल्ह्यातील चार उमेदवारांनी यश संपादन केले आहे. या कामगिरीमुळे कौशल्य विकास क्षेत्रात जिल्ह्याने गरुडझेप घेतली असून, ही बाब जिल्ह्यासाठी गौरवास्पद असल्याचे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले.जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते या यशस्वी उमेदवारांचा त्यांच्या पालकांसह गुणगौरव करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. समाजात स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी कौशल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आज अनेक नवीन संधी विद्यार्थ्यांना खुणावीत आहेत. तरुणांनी विविध क्षेत्रात आपली कौशल्ये विकसित करावीत, असे श्री. येरेकर म्हणाले. या विजेत्यांना पुढील प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रवासासाठी जिल्हा प्रशासनाकडून सर्वतोपरी मार्गदर्शन व मदत करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.या स्पर्धेत अमरावतीला दोन प्रथम आणि दोन द्वितीय क्रमांकाची पारितोषिके मिळाली आहेत. यामध्ये फार्मसीची विद्यार्थिनी असलेल्या कु. सारथा (निशा) बंड हिने केवळ कुकिंग या छंदाच्या जोरावर राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तसेच आदर्श लिहारे याने सॉफ्टवेअर टेस्टिंगमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. पुण्या-मुंबईच्या स्पर्धकांसमोर सुरुवातीला मनात शंका होती, मात्र निकालानंतर आपणही कोणापेक्षा कमी नाही हा विश्वास मिळाल्याचे आदर्शने आपल्या मनोगतात सांगितले.शशांक लोखंडे यांनी इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि विराज पुसदकर यांनी केमिकल लॅबोरेटरी असिस्टंट या विषयात द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याची शान वाढविली आहे.'कौशल्यांचे ऑलिम्पिक' मानली जाणारी ही स्पर्धा दर दोन वर्षांनी होते. २०२६ ची जागतिक स्पर्धा शांघाई (चीन) येथे आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेची पूर्वतयारी म्हणून राज्यभरात ६३ क्षेत्रांत स्पर्धा घेण्यात आल्या होत्या, ज्यामध्ये अमरावतीच्या १५ उमेदवारांनी प्रतिनिधित्व केले होते.

# परतवाडा येथे 'ॲडव्हान्स ब्युटी पार्लर' प्रशिक्षण संपन्न

## ३२ महिलांना प्रमाणपत्रांचे वाटप



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१४ अचलपूर** अचलपूर तालुक्यातील परतवाडा येथे 'डव्हान्स ब्युटी पार्लर' प्रशिक्षण बॅचचा निरोप समारंभ नुकताच उत्साहात पार पडला. १ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या या एक महिन्याच्या विशेष प्रशिक्षणाचा समारोप प्रमाणपत्र वितरण सोहळ्याने करण्यात आला. या उपक्रमाचा एकूण ३२ महिला लाभार्थ्यांनी लाभ घेतला.या कार्यक्रमाला विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, उपव्यवस्थापक ऋषिकेश कथलकर, एमसीडी प्रकल्प अधिकारी राजेश सुने, आयोजक गणेश बहाड आणि प्रशिक्षिका जोत्स्ना राऊत उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व ३२ महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर यांनी महिलांना मार्गदर्शन करताना स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन केले. तसेच, व्यवसाय उभारणीसाठी 'अमृत' आणि 'एमसीडी' मार्फत सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रकल्प अधिकारी राजेश सुने यांनी लाभार्थ्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती देऊन या योजनेच्या माध्यमातून अर्थसाहाय्य मिळवून आपला व्यवसाय यशस्वी कसा करावा, याचे तंत्र समजावून सांगितले.कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास वाढला असल्याचे सांगितले. प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.काही महिलांनी स्वतःचा व्यवसायदेखील सुरू केला आहे.

# नागपूर विभागातील तीन शेतकऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार

## ११५ विजेत्या शेतकऱ्यांना सात लाखांची बक्षिसे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

रब्बी हंगाम २०२४च्या पीक स्पर्धा योजनेंतर्गत नागपूर विभागातील एकूण ११५ विजेत्या शेतकऱ्यांना ७-लाखांच्या बक्षीसे लवकरच वितरीत होणार आहेत. विभागातून तीन शेतकऱ्यांना राज्यस्तरीय, ३८ शेतकऱ्यांना जिल्हा तर ७४ शेतकऱ्यांना तालुका स्तरीय पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या योजनेंतर्गत राज्यातील १ हजार ७ शेतकऱ्यांना बक्षिस वितरीत करण्यात येणार आहे. राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे व त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण कृषी उत्पादनात भर पाडण्याच्या उद्देशाने शासन राज्यातील शेतकऱ्यांसाठी पीक स्पर्धांचे आयोजन करते. राज्यातंर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांच्या पीकस्पर्धा घेण्यात येते. सन २०२५-२६ साठी विविध कृषी पुरस्कार व पीकस्पर्धा योजनेअंतर्गत ८ कोटींची अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे. तर रब्बी हंगाम २०२४ मधील, एकूण १००७ पीकस्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांना बक्षीस रक्कम अदा करण्याकरिताकृषी, पशु संवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या १३ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार कृषी आयुक्तालयास ५७लाख २० हजारांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागपूर विभागातील शेतकऱ्यांपैकी ११५ शेतकऱ्यांची निवड तीन स्तरांवरील पुरस्कारांसाठी करण्यात आली. यानुसार तीन शेतकऱ्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली असून बक्षिसापोटी १ लाख २० हजारांचा निधी वितरीत करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरीय पुरस्कारासाठी ३८ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून बक्षिसापोटी २ लाख ८९ हजारांचा निधी वितरीत करण्यात येणार आहे. तर ७४ शेतकऱ्यांची तालुकास्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली असून बक्षिसापोटी २ लाख ९१ हजारांचा निधी वितरीत करण्यात येणार आहे.

# राज्यस्तरीय हँडबॉल क्रीडा स्पर्धेमध्ये अमरावतीच्या मुलींचा संघ उपविजेता

## राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत मिळवले यश, मुलींच्या सांघिक खेळाचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

नांदेड येथे नुकत्याच झालेल्या ४७ व्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत अमरावती मुलींच्या जिल्हा संघाने अप्रतिम सांघिक खेळाच्या आधारे उपविजेतेपदावर ताबा मिळवला. या स्पर्धेत अमरावती संघाने गडचिरोली, जालना, कोल्हापूर, नांदेड, मुंबई संघावर सहज विजय प्राप्त करून अंतिम फेरीत धडक दिली. चंद्रपूर संघाविरुद्ध झालेल्या चुरशीच्या अंतिम लढतीत अमरावती जिल्हा संघाला केवळ दोन गोलने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या संघाला प्रशिक्षक नितीन जाधव तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांचे मार्गदर्शन लाभले.



उपविजेत्या अमरावती मुलींच्या जिल्हा संघात कर्णधार सलोनी यादव, श्रावणी निर्मल,आर्या झाडे, इशिका कावळे, प्रज्ञा कोसे, श्रावणी मुन, आराध्या चौधरी, म्रिदिनी ठाकरे, मीनाक्षी वानखडे, स्वरा ठाकरे, नेहा डुकरे, संयुक्ता भोकरे, परिदी तिडके, मुग्धा बंड, राधिका शेंडगे, श्रुती वाघमारे या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. संपूर्ण स्पर्धेत अमरावती महिला संघ अंतिम सामन्यापर्यंत पराभूत झाला नाही, हे विशेष. चंद्रपूर संघाने अंतिम क्षणांत उत्तम रणनितीसह काही चांगले आक्रमण केल्यामुळे तसेच त्यांच्या काहीशा वेगवान खेळामुळे अमरावतीच्या मुलींचा संघाला बचावाची संधीच मिळाली नाही. अन्यथा या सामन्यात अमरावतीच्या मुलींनी यश मिळवण्यात कोणतीही कसर शिल्लक ठेवली नव्हती.संघाचे प्रशिक्षक नितीन जाधव, संघ व्यवस्थापक प्रिया सहारे तसेच अमरावती जिल्हा हँडबॉल संघटनेचे सचिव, राज्य संघटनेचे उपाध्यक्ष व शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्राचार्य डॉ. हनुमंत लुंगे यांनी महिला संघाकडून उत्कृष्ट सराव करून घेतला.

प्राचार्य डॉ. हर्षद मालधुरे, क्रीडा शिक्षक धरम पडोळे, संजय बाळापुरे, डॉ. सुगंध बंड, डॉ. हरीश काळे, आनंद उईके, राहुल रामटेके, कार्तिक मरसकोल्हे व संकेत बोके यांनी उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले आहे.दरम्यान मुलींच्या संघाने मिळवलेल्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रशिक्षक आणि शाळा प्रशानाकडून देखील मुलींच्या संघाकडून मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या असून, मुलींना खेळासाठी हवे असलेल्या सर्व साहित्य पुरवण्यात येईल. त्यांना कुठल्याही गोष्टींची कमी पडणार नाही. असे प्रशासनाने सांगितले आहे.

# पूर्णा नदीच्या काठावर वसलेले कोटेश्वर मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान

## महाशिवरात्रीच्या पर्वावर जय भोलेंच्या दर्शनार्थ उसळणार भक्तांचा जनसागर?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४खोलापूर**

भातकुली तालुक्यातील खोलापूर येथील अतिशय पुरातन पूर्णा नदी तीरावर वसलेले श्री कोटेश्वर मंदिर हे भाविक भक्तांचे श्रद्धेचे व धार्मिक आस्थेचे तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे परिसरातील खेड्यापाड्यातील हजारो लोक महाशिवरात्रीच्या पर्वावर मोठ्या संख्येने भोलेनाथाचे दर्शन घेण्यासाठी आस्थेने येतात. दोन दिवस चालणारा महा शिवरात्रीचा उत्सव साजरा करण्यासाठी श्री कोटेश्वर मंदिराची रंग रंगोटी व आकर्षित विद्युत रोषणाई, परिसर स्वच्छ व आकर्षक मंडप सजवण्यात आले आहे. श्री कोटेश्वर मंदिर भक्तांच्या दर्शनार्थ सज्ज झाले आहे.



महाशिवरात्रीच्या उत्सवाला अनन्य साधारण महत्व असल्याने भाविक भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांपासून तर युवक व युवती महिला, नागरिक, ज्येष्ठ नागरिक उपवास ठेवून भोलेनाथाची उपासना केल्या जाते.भाविक भक्त उपासनेतून सकाळपासून श्री कोटेश्वर मंदिरात भक्तगण भक्ती भावाने एकत्र जमतात व श्रद्धेने ज्योतिलिंगाची पिंडीची पूजा अर्चा करतात. ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणी असलेल्या कुंडाच्या पाण्यातील पिंडीच्या स्नान करून अभिषेक, पूजा अर्चा बेलपत्री वाहून शंकराच्या नावाचा जयघोष केला जातो. महादेवाची वारी करणारे शंकराचे भक्त त्रिशूल घेऊन डफफडीच्या तालावर देवा तुझ्या वाटेने गा भजनाने भोलेनाथाचे नामस्मरण करून मंदिर परिसरातील वातावरण भक्तीमय केल्या जाते. बहुसंख्य भाविकांना महाशिवरात्रीचा उपावास असल्याने काही सेवाभावी संस्थेकडून भक्तांना फराळाचे वितरण करण्यात येते.

वर्षातून एकदा येणाऱ्या महाशिवरात्री पर्वाला परिसरातील प्रसिद्ध असलेल्या श्री कोटेश्वर मंदिरात खेड्यापाड्यातील भक्तगण कुटुंबासह दर्शन घेतात. मंदिर परिसरात दुकाने थाटल्या जातात. बेलपत्री प्रसाद खाऊ व खेळणीचे व घरगुती येणाऱ्या वस्तूंचे यात्रेकरू खरेदी करून महाशिवरात्रीचा उत्सव साजरा करतात. विशेषतः खोलापूर हे गाव पूर्णा नदी तीरावर वसले असल्याने ऐतिहासिक अति प्राचीन महादेवाचे मंदिर या नदीकाठावर वसलेले आहे. काळेश्वर, खोलेश्वर, हरेश्वर, झोमलेश्वर, निळकंठेश्वर इत्यादी महादेवाची मंदिर भाविक भक्तांनी गजबजणार आहे.श्री कोटेश्वर मंदिर चालणाऱ्या दोन दिवस महाशिवरात्रीच्या उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी श्री कोटेश्वर संस्थानचे अध्यक्ष रावसाहेब देशमुख, संस्थेचे सचिव प्रकाश पांडे, कार्यकारणी मंडळ व पोलीस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवला जातो.

# हरभऱ्याला मुहूर्ताला ५२५१ रुपयांचा भाव

## नांदगाव बाजार समितीत जोरदार आवक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव खंडेश्वर**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत आज रब्बी हंगामातील नवीन हरभऱ्याची पहिली आवक दाखल झाली. या मुहूर्ताच्या हांगला भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. धानोरा मोगल येथील शेतकरी वैभव मुंडवाईक यांनी आपल्या शेतातील नवीन हरभरा आज विक्रीसाठी बाजार समितीत आणला होता. हा शेतमाल सतीश गिड्डे यांच्या अडत दुकानावर विक्रीसाठी आला असता, व्यापारी सचिन लड्ढा यांनी ५२५१ रुपये असा उच्चांकी भाव देऊन या हरभऱ्याची खरेदी केली.



**काटा पूजन व शेतकरी सन्मान**

हंगामाच्या सुरुवातीलाच नवीन मालाची आवक झाल्यामुळे बाजार समितीचे सभापती प्रभात पाटील ढेपे यांच्या हस्ते विधिवत 'काटा पूजन' करण्यात आले. यावेळी सभापतींनी शेतकरी वैभव मुंडवाईक यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला व त्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळेस बाजार समितीचे संचालक डॉ. राजेंद्र पांडे, प्रमोद ठाकरे, पंकज ठाकरे, विवेक वैष्णव, अडते व्यापारी नंदकिशोर लड्ढा, सतीश शिरभाते, अक्षय ब्राम्हणवाडे, गजानन गिड्डे, जावेद, बाजार समिती सचिव अ. ज. मोहोड व इतर मंडळी उपस्थित होती.

# अंजनगाव परिसरात सरकारी धान्याचा सर्रास काळाबाजार

## रॅकेटची पाळेमुळे परतवाड्यापर्यंत, हजारो क्विंटल तांदूळ तस्करी धनाढ्य व्यापाऱ्यासह भ्रष्ट यंत्रणेवर कारवाईची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अंजनगाव सुर्जी**

स्थानिक शहर आणि ग्रामीण भागातून गरिबांच्या हक्काच्या रेशन धान्याचा मोठ्या प्रमाणात काळाबाजार होत असल्याचे समोर आले आहे. अंजनगावातून संकलित होणारा हा तांदूळ परतवाडा-चांदूरबाजार मार्गावरील एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या गोडाऊनमध्ये जात असून, राजकीय वरदहस्त आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गोरखधंदा राजरोसपणे सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

अशी होतेय तस्करी मिळालेल्या माहितीनुसार,रेशनकार्ड धारकांना मिळणारा तांदूळ गरजेपेक्षा जास्त असल्याने किंवा खाण्यासाठी कमी वापरला जात असल्याने, अनेक ग्राहक २० ते २२ रुपये किलो दराने तो स्थानिक दुकानदारांना किंवा फिरत्या दलालांना विकतात. तस्करांची काही टोळी ग्रामीण भागात घरोघरी जाऊन हा तांदूळ गोळा करते. अंजनगाव शहरातीलकाही प्रमुख तस्कर हा तांदूळ विविध गोडाऊनमध्ये साठवून ठेवतात आणि रात्रीच्या वेळी मालवाहू गाड्यांमधून (पिकअप, ट्रक) अंजनगाव-पथ्रोट मार्गे परतवाड्याला रवाना करतात.

**परतवाड्याचे 'ते' गोडाऊन केंद्रबिंदू**

परतवाडा-चांदूरबाजार रोडवरील एका मोठ्या गोडाऊनमध्ये दरमहा हजारो क्विंटलतांदूळ जमा होतो. हा संबंधित व्यापारी बडा प्रस्थ असून त्याचे मोठे अधिकारी आणि राजकीय नेत्यांशी घनिष्ठ संबंध असल्याचे बोलले जाते. याच संबंधांच्या जोरावर आजवर या व्यापाऱ्यावर किंवा या मार्गावरून जाणाऱ्या गाड्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

या संपूर्ण तस्करीची इत्थंभूत माहिती स्थानिक पोलिसांना असूनही ते मूग गिळून गप्प का? असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे. महसूल विभाग आणि पोलीसप्रशासनाच्या डोळ्यादेखत दरमहा गाड्या भरून माल जात असतानाही कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त होत आहे.


वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लक्षगोरगरिबांच्या तोंडचा घास पळवणाऱ्या या धान्य तस्करांविरुद्ध आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध जिल्हा पोलीस अधीक्षक आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी अंजनगाव तालुक्यातील त्रस्त नागरिकांनी केली आहे.

# कर्जमाफीची प्रक्रिया वेगात; डेटा अपलोडसाठी १५ फेब्रुवारी अंतिम मुदत

## थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती पोर्टलवर भरण्याचे सहकार आयुक्तांचे आदेश १० हजार शेतकरी आधार न दिल्याने वगळले जाण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

राज्य शासनाने प्रस्तावित शेतकरी कर्ज सवलत योजनेच्या हालचालींना वेग दिला असून, थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. शासनाच्या निर्देशानुसार सर्व बँकांनी आपल्याकडील कृषी कर्जदारांची माहिती विशेष पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासाठी १५ फेब्रुवारी २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सर्व संबंधित बँकांना याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. महा-आयटीमार्फत विकसित करण्यात आलेले पोर्टल कार्यान्वित झाले असून, बँकांच्या नोडल अधिकाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षणही देण्यात आले आहे. यापूर्वीच 'फॉर्मेट-ए' मध्ये कर्जदारांची माहिती तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खासगी क्षेत्रातील बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक तसेच जिल्हा सहकारी बँकांचा समावेश आहे. सर्व बँकांनी थकबाकीदार शेतकऱ्यांचा अचूक व अद्ययावत डेटा अपलोड करणे आवश्यक आहे. या माहितीच्या आधारेच शासनाकडून कर्जमाफी अथवा कर्ज सवलतीसंदर्भातील निकष निश्चित केले जाणार आहेत.दरम्यान, जिल्ह्यातील सुमारे १० हजार शेतकऱ्यांनी अद्याप आपले आधारकार्ड जिल्हा बँकेकडे सादर केलेले नसल्याची माहिती समोर आली आहे. आवश्यक कागदपत्रे न दिल्यास संबंधित शेतकऱ्यांची नावे लाभार्थी यादीतून वगळली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तातडीने कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.सततचा पाऊस, अतिवृष्टी, तसेच बाजारभावातील चढ-उतारामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत नव्या कर्ज सवलत योजनेच्या हालचालींमुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही योजना 'फोकस्ड सपोर्ट' तत्त्वावर आधारित असल्याने सरसकट कर्जमाफीऐवजी नैसर्गिक आपत्तीमुळे कर्जफेड करू न शकलेल्या व प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे.बँकांकडून डेटा वेळेत अपलोड झाल्यास शासन लवकरच योजनेची अधिकृत घोषणा करेल, अशी शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष १५ फेब्रुवारीच्या डेडलाइनकडे लागले आहे.



# हव्याप्रमंची 'भानगड' राज्यस्तरावर चमकली; स्पर्धेतील प्राथमिक फेरीत तृतीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा वारसा जोपासत संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालय उच्च तंत्रशिक्षण क्षेत्रात आपल्या आगळ्यावेगळ्या शैक्षणिक उपक्रमातून चर्चेत असते. याच अभियांत्रिकी महाविद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेत सादर केलेली 'भानगड' ही एकांकिका प्राथमिक फेरीत तिर्स ?या तिर्स ?या क्रमांकावर यशस्वी ठरली असून महाअंतिम फेरीत प्रवेश केला आहे.



गावातील सात नराधमांनी एका मुकी असलेल्या मुलीवर अत्याचार केले. प्रकरणास वाचा फोडली तर जीवावर बेतेल अशी धमकी सुद्धा तिला दिली. समाज काय म्हणेल, आपल्या भवितव्याचे कसे होईल, या प्रश्नाने ती चिंतेत असतांना झालेल्या अत्याचारामुळे तिचा आक्रोश मनामध्ये धगधगत होता. बोलता येत नसल्याने तिची वेदना कोणाला कळत नव्हती; मात्र एका शिक्षकाने ती वेदना हेरली आणि तिच्या मूक वेदनेला समाजस्तरावर वाचा फोडली, हे सांगणारी या एकांकिका आहे. हव्याप्र मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास कक्षाचे प्रमुख प्रा. शुभम ठाकरे दिग्दर्शित व प्रा. प्रवीण पाटेकर लिखित 'भानगड' एकांकिका राज्यस्तरीय स्पर्धेत सादर करण्यात आली.दर्जेदार पटकथा, उत्कृष्ट अभिनयाने 'भानगड' ने प्राथमिक फेरीतून तृतीय क्रमांक पटकावून महाअंतिम फेरीमध्ये प्रवेश केला आहे. यामध्ये वैयक्तिक पारितोषिकामध्ये निर्मिती तृतीय, दिग्दर्शन द्वितीय, संगीत प्रथम, रंगभूषा द्वितीय, प्रकाशयोजना द्वितीय या सोबतच एकूण ७५ हजाराचे रोख पारितोषिके पटकावले. सोबतच नुकताच पार पडलेल्या रायसोनी करंडक राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन स्पर्धेच्या महाअंतिम फेरीमध्ये या एकांकिकेने मजल मारून तब्बल ३ पारितोषिकासह चतुर्थ क्रमांकाचे ३० हजाराचे पारितोषिक व सन्मानपत्र पटकावले. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये स्त्री अभिनय द्वितीय, प्रकाशयोजना प्रथम, नैपथ्य द्वितीय, निर्मिती उत्साहानपर पहिले पारितोषिक पटकावले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे इंडस्ट्री रिलेशन अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. प्रणव चेंडके यांच्या कला, साहित्य क्षेत्रातील पुढाकाराने अभियांत्रिकी महाविद्यालयाने साहित्य क्षेत्रामध्ये भरारी घेतली असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस दाळू यांनी एकांकिकेमध्ये सहभागी विद्यार्थी प्रणव कोरे, श्रेयस सरडे, निखिल सखे, निशांत जामनिक, ऋषी भंडारकर, आदित्य ढोरे, लोकेश बोदरकर, सुयश तामखाने, गायत्री चतारकर यांचेसह सर्व चमूचे अभिनंदन केले.

# मनपा स्वीकृत सदस्य, स्थायी समिती सदस्यांची होणार निवड

## महापौरांच्या उपस्थितीत मनपाची पहिली सर्वसाधारण सभा २० ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

अमरावती महानगर पालिकेचे १७ वे महापौर महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या आदेशानुसार महापालिकेची पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवारी २० फेब्रुवारी रोजी स. ११ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

आठ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती हेच या सभेचे वैशिष्ट्य राहणार आहे. त्याचप्रमाणे महापालिकेची - तिजोरी असलेल्या स्थायी समिती सभापती, १६ सदस्यीय स्थायीसमितीची नियुक्ती या सभेत केली जाणार आहे. त्यानंतर प्रश्नोत्तराचे तास होणार आहेत.महापालिकेच्या निवडणुकीला आता एक महिना होत आला असून, अद्याप स्थायी समिती सभापती



व सदस्यांची निवड झाली नाही. त्यामुळे स्थायी समितीचे सभापती कोण होणार ही शहरवासीयांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब असून या समितीवर कोणाकोणाची वर्णी लागणार याबाबत उत्सुकता ताणून राहिली आहे. सोबतच ८ स्वीकृत सदस्यांचीही निवड होणार आहे. यात महायुतीतील किती स्वीकृत सदस्य सभेतच कळणार आहे कारण, सर्वाधिक २५नगरसेवक भाजपचे आहेत. त्यानंतर १५ नगरसेवक वायएसपीचे व ११ नगरसेवक हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजीत पवार गटाचे आहेत. महायुतीचे मनपा सभागृहात एकुण ५४ नगरसेवक असल्यामुळे साहजिकच महायुतीचे स्वीकृत नगरसेवकही जास्त राहतील. पराभूत उमेदवारांना स्वीकृत नगरसेवक बनवू नये. असे सूर उमटत असल्यामुळे नेमकी कोणाकडे स्वीकृत नगरसेवक पदाची जबाबदारी दिली जाते हा देखील उत्सुकतेचा विषय आहे.

# महाशिवरात्री उत्सवानिमित्त शिवालये सजली; सर्वत्र हरहर महादेवाचा जयघोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



शहरात महाशिवरात्रीनिमित्त विविध महादेव मंदिरांमध्ये अभिषेक, पूजा, प्रसाद वितरण तसेच भाविकांना सुरक्षित दर्शन घेता यावे, या उद्देशाने जय्यत तयारी करण्यात आली आहे. गडगडेश्वर, तपोवनेश्वर, कोंडेश्वर आणि नागेश्वर मंदिरात अभिषेक, महाआरती, ढोल-ताशा वादन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, भाविकांमध्ये उत्साह पाहायला मिळणार आहे. रविवार १५ शोजी महाशिवरात्री असून शिव भक्तांकडून आतापासूनच बाजारात पूजेचे साहित्य खरेदीसाठी गर्दी होत आहे. तसेच जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरांमध्ये यात्रा महोत्सव साजरा करण्यात येत असून, धार्मिक कार्यक्रमांनाही सुरुवात झाली आहे. महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहर शिवभक्तीच्या लाटेत न्हाऊन निघाले आहे. शहरातील विविध पुरातन आणि ऐतिहासिक महादेव मंदिरांमध्ये 'हर हर महादेव', जय भोलेनाथ असा एकच जयघोष ऐकू येत आहे. या महाशिवरात्रीच्या निमित्ताने शहरातील गडगडेश्वर मंदिर, श्री कोंडेश्वर मंदिर, ऐतिहासिक श्री महादेव मंदिर आणि महादेवाचे खोरे, तपोवनेश्वर मंदिर, नागेश्वर मंदिर घामंत्री, नागमंदिर चांदुर रेल्वे, सालबर्डी येथील मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय इतर सर्वच लहान-मोठ्या महादेव मंदिरांमध्ये महाशिवरात्रीनिमित्त आकर्षक सजावट करण्यात आली असून, शिवलिंगाचा फुले, बिल्वपत्रे, दुपट्टयाने शृंगार केला जात आहे. दर्शनासाठी होणारी भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनांकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

साबुदाना खिचडीचे होणार वितरण भुतेश्वर महादेव मंदिरात ५०० किलो, गडगडेश्वर महादेव मंदिरात ५०० किलो, तसेच शहरातील विविध संस्था संघटनांद्वारे जुन्या ५० किलो, कुठे १०० किलो साबुदाण्याच्या खिचडीचे अमरावती येथील मंदिरांमध्ये कुठे वितरण केले जाणार आहे. गडगडेश्वर महादेव मंदिरात दरवर्षी दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भाविकांनी भक्त परिवार आपापल्या ऐपतीप्रमाणे पिण्याच्या पाण्याची बाटली तसेच साबुदाण्याच्या खिचडीचे वितरण करीत असतात. शहरात महाशिवरात्रीला बहुतेक भाविकांचा उपवास असल्याने साबुदाना खिचडी वितरित केली जाणार आहे.

**धामंत्री येथे ४११ किलोची घंटा**

१९ व्या शतकात भक्तांचे इच्छापूर्तीचे फल स्वरूप या मंदिराला एक मोठी घंटा धामंत्री नागेश्वर मंदिर येथे दान केली गेलेली आहे. अष्ट घातपासून निर्मित ही घंटा ४११ किलो वजनाची आहे, ही घंटा कोरीव आणि नक्षीदार काम केलेल्या तीन मजली घंटाघरामध्ये लागलेली असून, या घंटाघराचे बांधकाम तळमजल्यावर एक मोठे शिवलिंग, मध्यभागी नंदी आणि आणखी एक शिवलिंग तसेच वरील मजल्यावर विशाल ४११ किलो वजनाची घंटा लागलेली आहे, अशा प्रकारचे हे बांधकाम केलेले असून, बाहेरून एक विशिष्ट नक्षीकाम करून हे घंटाघर तयार करण्यात आले आहे, अशी माहिती परिसरातील भाविकांनी सांगितली.

# शिवजयंतीनिमित्त १९ ला विदर्भस्तरीय शिव दौड

## शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्थाद्वारा संचालित श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयच्या सुवर्ण महोत्सव वर्षांच्या अनुषंगाने १९. फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव व डॉ. पंजाबराव उपाखा भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती वर्षा निमित्त विदर्भस्तरीय शिव दौड मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा विदर्भातील धावपटूंना आपली क्रीडाक्षमता दाखविण्याची सुवर्णसंधी देणाऱ्या विदर्भस्तरीय शिव दौड मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने खेळाडू , विद्यार्थी, पुरुष व महिला मंडळी सहभागी होणार असून, क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. करिता विदर्भस्तरीय शिव दौड मॅरेथॉन स्पर्धेमध्ये पुरुष व महिला गटांसह विविध वयोगटांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये १९ वर्षांआतील मुले व मुली, १४ वर्षाआतील मुले व मुली, तसेच ४५ वर्षांवरील पुरुष व ४० वर्षांवरील महिला या गटांसाठी स्वतंत्र शर्यती आयोजित करण्यात आल्या आहेत. प्रत्येक गटासाठी नियम व अंतर आयोजकांकडून निश्चित करण्यात आले असून स्पर्धा पूर्णतः शिस्तबद्धव सुरक्षित पद्धतीने पार पडणार आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश युक्कांमध्ये धावण्याविषयी आवड निर्माण करणे, आरोग्याबाबत जनजागृती करणे तसेच विदर्भातील उदयोन्मुख धावपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. सदर विदर्भस्तरीय शिव तंदुरुस्ती, सहनशक्तीत्र क्रीडावृत्ती दौड मॅरेथॉन स्पर्धेमुळे शारीरिक विकसित होण्यास मोठी मदत होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक समिती, क्रीडाशिक्षक, प्रशिक्षक, महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी पथक संबंधित स्वयंसेवक तसेच वैद्यकीय सज्ज ठेवण्यात आले आहे. धावपटूंच्या सुरक्षिततेसाठी मार्गावर आवश्यक त्या सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व वैद्यकीय सेवासहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध राहणार आहे स्पर्धेमध्ये सहभाग प्रमाणपत्र, टी-शर्ट, मेडल व अल्पोपहाराची सुविधा देण्यात येणार असून स्पर्धेदरम्यान वैद्यकीय सुविधा व प्राथमिक उपचारांची योग्र व्यवस्था करण्यात येणार आहे.स्पर्धेला क्रीडाप्रेमी नागरिकांनी, त्यानुसार या विदर्भ स्तरीय मॅरेथॉन महिलांनी, विद्यार्थ्यांनी, खेळाडूंनी सदर शिव दौड स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आवाहन शिवदौड स्पर्धेचे स्वागत कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, आयोजन समितीचे अध्यक्ष तथा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, सचिव डॉ. उल्हास देशमुख, डॉ अतुल पाटील यांच्याद्वारे करण्यात आले आहे.

# कठोरा नाका परिसरात सराफा व्यावसायिकाची सशस्त्र लूट ८० तोळे सोने लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



शहरातील कठोरा नाका ते पोटे पाटील रोड दरम्यान शुक्रवारी रात्री एका सराफा व्यावसायिकाला लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ६ ते ८ सशस्त्र लुटारूंनी भररस्त्यात हा थरार घडवून आणला असून, या घटनेमुळे संपूर्ण अमरावती शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुशांत मनोहर शेरेकर (रा. बालाजी नगर, कठोरा रोड) हे त्यांचे सराफा दुकान बंद करून रात्री १० च्या सुमारास घरी जात होते. यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात ६ ते ८ लुटारूंनी त्यांना अडवले आणि शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्याकडील दागिन्यांची बॅग हिसकावून नेली. व्यावसायिकाच्या दाव्यानुसार, लुटारूंनी त्यांच्याकडून सुमारे ८० तोळे (८०० ग्रॅम) सोन्याचे दागिने लुटले आहेत.

**पोलीस ताफा घटनास्थळी दाखल**

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस आयुक्त, डीसीपी गणेश शिंदे, श्याम घुगे, गुन्हे शाखा प्रमुख संदीप चव्हाण आणि गाडगे नगरचे ठाणेदार अतुल वर यांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी परिसराची नाकेबंदी केली असून लुटारूंचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.

व्यावसायिकाने ८० तोळे सोन्याची लूट झाल्याचा दावा केला असला, तरी पोलिसांनी अद्याप अधिकृतपणे दागिन्यांच्या निश्चित किमतीला किंवा वजनाला दुजोरा दिलेला नाही. पोलीस सध्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. भरवस्तीत आणि वर्दळीच्या रस्त्यावर घडलेल्या या धाडसी चोरीमुळे स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे.

# वंदे भारत एक्सप्रेसमध्ये साप सोडणारा माथेफिरू गजाआड

## मध्य रेल्वेच्या आरपीएफ पथकाने बांधल्या मुसक्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ नागपूर**



वंदे भारत एक्सप्रेसमध्ये साप सोडून प्रवाशांसह रेल्वे प्रशासनात खळबळ उडवून देणाऱ्या माथेफिरूचा अखेर तब्बल दीड महिन्यानंतर छडा लागला. जगन अर्जून भाले (वय ३७) असे आरोपीचे नाव असून रेल्वे सुरक्षा दलाच्या पथकाने त्याला मुंब्रा येथून आज १२ फेब्रुवारीला अटक केली.

प्रवाशीच नव्हे तर रेल्वे प्रशासनाला हादरवून सोडणारी ही घटना २७ डिसेंबर २०२५ रोजी घडली होती. सीएसएमटी-सोलापूर दरम्यान धावणाऱ्या ट्रेन नंबर २२२२५च्या कोच नंबर सी-१६ च्या शौचालयात एक साप आढळला होता. माहिती कळताच रेल्वेची अख्खी यंत्रणाच सापाला पकडण्यासाठी कामी लागली होती. अखेर सोलापूर स्थानकावर साप ट्रेनच्या बाहेर काढण्यात यश आले होते. साप ट्रेनमध्ये पोहचलाच कसा, असा प्रश्न निर्माण झाल्यानंतर रेल्वे यंत्रणांनी तपास सुरू केला.

सीसीटीव्हीच्या माध्यमातून साप ट्रेनमध्ये शिरला नाही तर त्याला एका माथेफिरून ट्रेनमध्ये आणून सोडल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे रेल्वे कायदा १९८९ च्या कलम १४५(ब), १४७ आणि १५३ अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेतला जाऊ लागला. तब्बल दीड महिन्याच्या तपासानंतर मध्य रेल्वेच्या आरपीएफला लिड मिळाली आणि त्या आधारे आज मुंब्रा येथे आरोपी जगन अर्जुन भाले याला अटक केली. चौकशीदरम्यान तो नाशिकचा रहिवासी असून, विकृत वृत्तीचा असल्याचे स्पष्ट झाले.

**गुन्ह्याची कबुली**
**१४ दिवसांची कोठडी**

आरोपी जगन भाले याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याला कल्याण रेल्वे न्यायालयाने १४ दिवसांची दंडाधिकारी कोठडी (एमसीआर) दिल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने आज दिली आहे.

# 'महाशिवरात्री'ला उपवास करता तर मग आरोग्याची काळजी घ्या

## नागरिकांनी शक्यतोवर दुकानात पाकीटबंद खाद्यपदार्थांची खरेदी करावी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



महाशिवरात्रीच्या दिवशी भाविक मोठ्या प्रमाणात उपवास करतात. उपवासाला मोठ्या प्रमाणात भगर, साबुदाणा, शिंगाडा व राजगिरा पीठ इत्यादी अन्नपदार्थांचे सेवन केले जाते. सदर पदार्थाचे सेवन केल्याने अन्न विषबाधासारख्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर अन्नपदार्थाचे सेवन करताना नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे करण्यात येत आहे.

महाशिवरात्री दोन दिवसांवर येऊन ठेपली आहे. अशात या दिवशी अनेक भाविक आपली मनःकामना पूर्ण करण्यासाठी महादेवाचा उपवास करतात. त्यामुळे या काळात उपवासाच्या खाद्यपदार्थाची दुकानातून मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. खाद्यपदार्थासाठी दुकानात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. मात्र, यांचा फायदा घेत काही दुकानदार शिळे पदार्थ, मुदतबाह्य साहित्य व भेसळयुक्त साहित्याची विक्री करतात. यामुळे भाविकांना विषबाधा होण्याची शक्यता असते. यामुळे भाविकांनी भक्तीसोबत आपल्या आरोग्याची काळजी घेत उपवास करताना काळजी घेण्याचे आवाहन अन्न व औषधी प्रशासन विभागातर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.

**उपवासाची सामग्री तपासणी करूनच घ्या**

विक्रेत्यांनी पॅकबंद अन्नपदार्थांचीच विक्री करावी. अन्नपदार्थ खरेदी करताना उत्पादक, घाऊक विक्रेत्यांकडून पावती, बिले घ्यावी. अन्नपदार्थांचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता, परवाना क्र., पॅकिंग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करून घ्यावी. मुदतबाह्य अन्नपदार्थाची विक्री करू नये. तयार अन्नपदार्थ उघड्यावर ठेवू नये व ते तयार करताना स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींची दक्षता घ्यावी.

बाजारातून उपवासाचे अन्नपदार्थ आणल्यानंतर ते निवडून स्वच्छ करा. शक्यतोवर पाकीटबंद पदार्थ घ्या. ते घेताना पाकिटावरचा पॅकिंग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासून घ्या. अन्नपदार्थ साठवताना ते स्वच्छ, कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवा; जेणेकरुन वातावरणातील ओलाव्यामुळे बुरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस अन्नपदार्थ साठवू नका, जास्त दिवस साठविलेले अन्नपदार्थ खाऊ नका. शक्यतोवर उपवासाचे उघड्यावरचे अन्नपदार्थ विकत आणू नका. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी.

भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनयुक्त पदार्थ आहेत. दोन-तीन दिवस सलग उपवास असताना या पदार्थांचे सेवन ॲसिडिटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थाचे सेवन पचनशक्तीनुसार मर्यादितच करावे. शिळ्या अन्नपदार्थाचे सेवन करू नये

# अमरावतीत व्हॅलेंटाईन डे ला विरोध; ऑक्सिजन पार्क परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

व्हॅलेंटाईन डे निमित्त अमरावती शहरात बजरंग दल, विश्व हिंदू परिषद व इतर हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध दर्शविला. पुलवामा हल्ल्याचा काळा दिवस असताना पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रचार होऊ नये, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली.शहरातील विविध बगीचे व निर्जनस्थळी बजरंग दलाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी पाळत ठेवली. विशेषतः ऑक्सिजन पार्क परिसरात कार्यकर्ते मोठ्या संख्येने दाखल झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी महिला सेलच्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राह्मणे पोलिसांच्या ताफ्यासह घटनास्थळी पोहोचल्या. कायदा हातात घेऊ नका. व्हॅलेंटाईन डे साजरा करा, मात्र अश्लील कृत्य किंवा चाळे खपवून घेतले जाणार नाहीत. अल्पवयीन तरुण-तरुणींवर पोलिसांची करडी नजर राहील,ङ्घ असा इशारा ब्राह्मणे यांनी दिला. शहरातील संभाव्य अश्लील प्रकारांवर पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून ठिकठिकाणी दामिनी पथक सज्ज ठेवण्यात आले आहे.दरम्यान, बजरंग दलाचे पदाधिकारी त्रिदेव डेडवाल यांनी पुलवामा शहीदांच्या स्मरणार्थ व्हॅलेंटाईन डे ला विरोध केल्याचे सांगितले.

# पोस्टाकडून आता तीर्थक्षेत्रांचा महाप्रसादही येणार घरपोच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

टपाल विभागाने आता नागरिकांसाठी एक अनोखी सुविधा सुरू केली आहे. गंगेचे पवित्र जल, तसेच महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांचा पवित्र प्रसाद घरपोच मिळणार आहे. यामुळे लोकांना तीर्थक्षेत्रांमध्ये जाऊन दर्शन करण्याची गजर कमी होणार आहे.

नागरिक हे गंगाजल आणि प्रसाद आता ऑनलाइन ऑर्डरही करू शकतात. ही योजना सध्या राज्यातील काही ठिकाणी सुरू झाली आहे. गतवर्षी जिल्ह्यात अनेकांच्या घरांत गंगाजल पोहोचवले गेले होते. सुरक्षित पॅकिंगसह प्रसाद पाठविला जाणार आहे. पोस्ट ऑफीसच्या या सुविधेने लोकांना घरबसल्या धार्मिक अनुभव घेता येणार आहे. विशेषतः दिवाळी श्रावण आणि महाराशिवरात्र यांसारख्या उत्सवांत ही सुविधा अधिक उपयुक्त ठरणार आहे.

**सध्या या ठिकाणी सुविधा**

सध्या पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औररंगाबाद अशा ठिकाणी ही सुविधा सुरू आहे. येत्या महिन्यात हळूहळू सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध होईल. पोस्ट ऑफिसने विशेष व्यवस्था केली आहे.

**पोस्टाकडून 'गंगाजल' घरपोच मिळणार**

पोस्ट विभागाने गंगेचे पवित्र जल घरपोच पाठविण्यासाठी सुविधा सुरू केली आहे. नागरिक आपला पत्ता देऊन गंगाजल सुरक्षित पॅकिंगमध्ये मागवू शकातात.

# चंद्रपुरात आता बहिष्कार नाट्य! भाजपचे निष्ठावान पदाधिकारी अस्वस्थ, जोरगेवारांना कार्यक्रमात निमंत्रित न करण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४चंद्रपूर**

महापालिका निवडणूक आणि महापौरपदी भाजपच्या संगीता खांडेकर विराजमान झाल्यानंतर माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार व आमदार किशोर जोरगेवार यांच्यातील वाद अधिक विकोपाला गेला. यातूनच आता भाजपमध्ये बहिष्कार नाट्य रंगले आहे.

महापौर पदग्रहण सोहळ्यावर बहिष्कार असो, की १७ 'एबी फॉर्म'ची चोरी, शिवसेनेसोबत 'डील' केल्याचा उल्लेख आणि मुनगंटीवारांचे मंत्रीपद माझ्यामुळे गेले, अशा वक्तव्यामुळे भाजपचे निष्ठावंत पदाधिकारी व कार्यकर्तेही अस्वस्थ आहेत. समाज माध्यमावर एकमेकांवर टीका करणाऱ्या चित्रफिती सार्वत्रिक होत असल्याने वारंवार पक्षशिस्तीचा भंग होत आहे.

त्यामुळे जनसामान्यात पक्षाची बदनामी होत असून प्रतिमा मलिन होत आहे. जोरगेवार समर्थकांनी महापौर पदग्रहण सोहळ्यावर बहिष्कार घातला. आता भाजपच्या निष्ठावान पदाधिकाऱ्यांनी आमदार जोरगेवार यांच्या कोणत्याही कार्यक्रमाला जायचे नाही आणि त्यांना निमंत्रितही करायचे नाही, असा निर्णय घेतला आहे.

मुनगंटीवार व जोरगेवार यांच्यात चित्रफितींच्या माध्यमातून 'सोशल मिडिया वॉर' रंगले आहे. दुसरीकडे, त्यांचे पदाधिकारी व कार्यकर्तेही एकमेकांशी भांडत आहेत. यामुळे भाजपची प्रतिमा मलीन होत आहे. हाच का तो शिस्तबद्ध संघटन असलेला पक्ष, असा प्रश्न जुनेजाणते पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित करीत आहेत. जोरगेवार यांना नैराश्याने ग्रासले की काय, अशा पद्धतीची

दुसरीकडे, मुनगंटीवार यांच्याकडूनही पाझारे पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असल्यामुळे दिल्लीत त्यांच्यासाठी उमेदवारी मागायला गेलो. भाजपत यापूर्वी गटबाजी नव्हती, मात्र आता दोन गटात पक्ष विभागला गेला आहे. प्रदेशाध्यक्षांचे आदेश धुडकावणाऱ्यांवर कारवाई होणार, अशी वक्तव्ये समोर आली आहे.